# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. विशेष महासभा दि. ०५/०७/२०१६

आज मंगळवार दि. ५/०७/२०१६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा सकाळी ११.३० वाजता सभा सुचना क्र. ०९ दि. ३०/०६/२०१६ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

| | | |
|---|---|---|
| १) | जैन गिता भरत | महापौर |
| २) | प्रविण मोरेश्वर पाटील | उपमहापौर |
| ३) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सभापती, स्थायी समिती |
| ४) | मुन्ना सिंग | सभागृह नेता |
| ५) | लियाकत ग. शेख | विरोधी पक्षनेता |
| ६) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | ॲड. रवि व्यास | सदस्य |
| ९) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| १०) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| ११) | मयेकर सरस्वती रजनीकांत | सदस्या |
| १२) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| १३) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १४) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १५) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| १६) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |
| १७) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १८) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १९) | पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २०) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| २१) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| २२) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २३) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २४) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २५) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २६) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २७) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| २८) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २९) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| ३०) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३१) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | शरद केशव पाटील | सदस्य |
| ३५) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३६) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३७) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३८) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३९) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ४०) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४१) | मेंन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४२) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४३) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |
| ४४) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४५) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४६) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ४७) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४८) | परमार अनिता भरत | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ४९) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५०) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५१) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५२) | कॅटलीन ऍन्थोनी परेरा | सदस्या |
| ५३) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५४) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५५) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५६) | सुजाता रविकांत शिंदे | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५७) | मेहता नरेंद्र लालचंद | सदस्य |
| ५८) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ५९) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६०) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६२) | सय्यद नुरजहॉं नझर हुसेन | सदस्या |
| ६३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६६) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६७) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६८) | भट दिप्ती शेखर | सदस्या |
| ६९) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७०) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७५) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७६) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७७) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७८) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ७९) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८०) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८१) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८२) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८३) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८४) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ८५) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८६) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८७) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |

<u>गैरहजर सदस्य –</u>

| | | |
|---|---|---|
| १) | सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| २) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ३) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ५) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ६) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ८) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ९) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| १०) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |
| ११) | हेमंत म्हात्रे | नामनिर्देशित सदस्य |

रजेचा अर्ज – निरंक

नगरसचिव :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा मंगळवार दि. ०५/०७/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२, दि. ३०/०६/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

नरेंद्र मेहता :-

महापौर मॅडमची परवानगी घेत नाही. मा. महापौर मॅडम आपले अनेक वाढदिवस साजरे झाले असतील पण आम्ही महानगरपालिकेच्या सभागृहात अनेक वर्षापासून आहोत पण महापौरांचा सभागृहात वाढदिवस हे १४ वर्षात पहिल्यांदा घडतो आहे. आम्हा सर्वांना आपल्या कामाबद्दल अभिमान वाटतो. ह्या सभागृहाच्या वतीने आणि भारतीय जनता पक्षाच्या वतीने माझ्या परिवाराच्या वतीने आणि शहराच्या वतीने, पत्रकार बंधू आणि गॅलरीत बसलेले सर्व नागरिक ह्यांच्या सर्वांच्या वतीने आपणाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा देतो आणि आपले अभिनंदन करतो.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम विशेष म्हणजे महिला महापौर आणि मागच्या महासभेत दिलेल्या सूचनेनुसार कदाचित असेल की प्रत्येकाच्या वाढदिवसाच्या दिवशी महासभा आयोजित करा त्याच्यानंतरही आपल्यापासून सुरुवात झालेली आहे. खरोखर महिला सक्षम महापौर म्हणून आपली कारकिर्द चांगल्याप्रकारे चालू आहे. मी शिवसेना पक्षाच्या वतीने, सर्व सदस्यांच्या वतीने आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देते.

लियाकत शेख :-

मा. महापौर मॅडम आज शुभदिवस आहे. आज आमच्या लाडक्या महापौरांचा वाढदिवस आहे. मी राष्ट्रवादी पक्षातर्फे तुम्हाला लाख लाख शुभेच्छा देतो तसेच तुमची पुढची वाटचाल अशीच रहावी अशी शुभेच्छा देतो. आणि आम्हाला स्टेजवर येऊन तुमचे अभिनंदन करण्यासाठी परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

प्रशांत केळुसकर :-

आम्ही प्रथमच ह्या सभेमध्ये आपला वाढदिवसाचा केक कापून साजरा करण्याची इच्छा व्यक्त करतो त्यासाठी परवानगी द्यावी.

जुबेर इनामदार :-

कॉंग्रेस पक्षाच्या वतीने आमच्या शहराच्या प्रथम नागरीक महापौर ह्यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसाच्या निमित्तावर त्यांनी आज सभा लावली. एक नविन पायंडा पाडला. कॉंग्रेस पक्षाच्या वतीने भरपूर शुभेच्छा त्यांचे आयुष्य सुखाचे समृध्दीचे पार पाडावे अशी त्यांना मी शुभेच्छा देतो.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, प्रशासनाच्या वतीने मी आपल्याला वाढदिवसाच्या निमित्ताने सर्व महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने शुभेच्छा देतो.

मा. उपमहापौर :-

आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या लाडक्या महापौर त्यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना उपमहापौर म्हणून सर्व सदस्यांच्या वतीने मी हार्दिक शुभेच्छा देतो.

राजू भोईर :-

बहुजन विकास आघाडीतर्फे महापौर मॅडमना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

मा. महापौर :-

आप सभीका प्यार देखके मेरा मन भर आया है। सभीने मेरे को अच्छी तरह से शुभेच्छा दी दिलसे शुभेच्छा दी आपके सभी के ब्लेसिंग के लिए मैं सभी का आभार व्यक्त करता हूँ। सभी गटनेता, विरोधी पक्षनेता, आमदार मेहताजी, पत्रकार बंधू और हमारे प्यारे नागरीक सभी का मैं दिल से आभार व्यक्त करती हूँ। बहुत बहुत धन्यवाद इसी तरह का प्यार आप बनाए रखे इसी तरह आर्शिवाद बनाए रखे। धन्यवाद।

नगरसचिव :-

मा. महापौरांच्या परवानगीने आपल्या सभागृहाच्या सदस्या सन्मा. सुनिला शर्मा ह्यांची कन्या मोहिनी शर्मा ह्यांनी २२ मे रोजी चेन्नई हॉटेल हॉल्टन आयोजितमध्ये प्रतियोगिता भाग घेतता होता त्या प्रतियोगितेत मिसेस इंडियाचा किताब जिंकल्याबद्दल त्यांचा आज सभागृहात सत्कार करणार आहोत. त्यांना बॉलिवूड हा किताब देखील मिळाला आहे. मा. महापौरांच्या परवानगीने मोहिनी शर्मा ह्यांना सभागृहात बोलवून महापौरांच्या वतीने पुष्पगुच्छ देण्यासाठी आमंत्रित करतो. सुनिला शर्मा ह्यांनी डायसवर यायचे आहे. सर्वांनी टाळ्यांनी त्यांचे स्वागत करायचे आहे. तसेच दुसरे सत्कार मुर्ती सुधाकर मिश्राजी हे आपल्या रविराज कॉम्पलेक्स मध्ये राहत असून ते गेली ३७ वर्ष प्राध्यापक मुंबईमध्ये एल्फीस्टन महाविद्यालयात सेवा करीत आहेत. ते प्रख्यात लेखक असून त्यांचे जवळ-जवळ १४-१५ ग्रंथ प्रकाशीत झाले आहेत त्यांनी प्रकाशीत झालेल्या ३३ पुस्तकांना राजकीय तसेच राष्ट्रीय असे १३ पुरस्कार मिळाले आहेत. सध्या त्यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य ॲकेडमी डॉ. राममनोहर त्रिपाठी पुरस्कार रक्कम एक लाख देऊन सरकारने गौरव

केला असे सुधाकर मिश्रा ह्यांना मी सभागृहात बोलवून त्यांचा मा. महापौरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करतो.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३१, भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्‌यसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

हरिश्चंद्र आमगावकर :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.१२२ खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असून सदर आरक्षणाचे एकुण क्षेत्र ४६,७०० चौ.मीटर आहे. त्यापैकी विकास हक्क प्रमाण पत्राव्दारे ३०५३३.६० चौ.मीटर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. सदर ताब्यातील क्षेत्राच्या १५%च्या मर्यादेत म्हणजेच ४५८०.०४ चौ.मीटर क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय आहे. तसेच भाईंदर (पुर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र.१२२ या जागेत हिन्दू हृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मारक अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार व आर्थिक तरतुद कमी पडल्यास वेगळ्या लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करुन तसा खर्च करण्यांत यावा. तसेच सदर स्मारके उभारण्यासाठी सल्लागार, शिल्पकाराची नेमणुक करणे, तसेच खर्चास ही सभा मान्यता देत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

तारा घरत :-

माझे अनुमोदन आहे.

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम, ह्या ठरावात आम्ही सुध्दा ठराव मांडत आहोत. सुचना म्हणून घ्यावे. ह्या महाराष्ट्रामध्ये युतीचे शिल्पकार स्व. बाळासाहेब ठाकरे आणि स्व. प्रमोद महाजन युती घडवून २५ वर्षापेक्षा जास्त झाले आणि भारतीय जनता पार्टी व शिवसेनेची युती वर्षानुवर्षेप्रमाणे झाली आणि हे दोघे ह्या युतीचे शिल्पकार आहेत ह्या अनुषंगाने मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.३३५ बगिचा अथवा आरक्षण क्र.३०० खेळाचे मैदान या जागेत स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारण्यात यावे. याकरीता स्मारके उभारण्यासाठी अनुभवी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करावी लागणार असून त्यांच्या मार्फत कामाचे आरखडे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करावे लागणार आहे. सदर स्मारके उभारण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्यास परवानगी देणेसाठी मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती समोर प्रस्ताव पाठवावा लागेल व सदर समितीच्या शिफारसी वरुन शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सदर काम हाती घ्यावे लागेल. प्रशासनाचा उपरोक्त प्रस्ताव पाहता प्रस्तावित स्मारके उभारण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर स्मारके उभारण्यासाठी सल्लागार, शिल्पकाराची नेमणुक करणे, शासकीय मान्यता घेणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त यांना देत आहे तसेच सदर कामी होणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

शरद पाटील :-

माझे अनुमोदन आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे. मा. स्व. बाळासाहेब ठाकरे ह्यांचे स्मारक बांधणे ह्या प्रस्तावास आमचा विरोध नाही. स्मारक बांधले पाहिजे भुतो न भविष्य स्मारक बांधले पाहिजे असा प्रशासनास आमचा आग्रह आहे. जर निधी कमी पडला तर आमचा निधी घ्या. हे आम्ही जाहिर करतो. परंतु तुम्ही जे गोषवाऱ्यात नमूद केले आहे त्याच्यात असे म्हटले आहे की ४६,७०० चौ.मी. आपल्याकडे जागा आहे. त्याच्यातले ३०,५३३ चौ.मी. जागा आपल्याला विकासकाच्या प्रमाणपत्रातून भेटलेली आहे. परंतु ह्या जागेमध्ये अतिक्रमण किती आहे. आणि अतिक्रमण विरहीत जागा किती शिल्लक आहे. तुम्ही जे १५ टक्के काढले आहे ते टोटल जागेचे काढले आहे आणि अतिक्रमण झाले आहे. तुमच्याकडे जागा व्हेकेंट नाही आहे. मग तुम्ही १५ टक्के कॅल्क्युलेशन कस करणार. साहेब तुम्ही प्लान पास करता ७/१२ उताऱ्यामध्ये जागा वेगळी असते. क्लीयरमध्ये जागा वेगळी असते. आणि एक्झीस्टिंग जागा वेगळी असते. मग तुम्ही एक्झीस्टिंग जागाजी आहे अतिक्रमण सोडून त्याच्यावर प्लान पास करता. हे जे १५ टक्के क्षेत्र कॅलक्युलेशन केले आहे. हे संपूर्ण जागेवर केलेले आहे मग तुम्ही तुमचा कन्सल्टंट नेमणार तो तुमच्या एवढ्या जागेवर कॅलक्युलेशन करणार आणि मग प्लानिंग करणार आणि एक्झीस्टिंग जागा छोटीशी असेल मग या स्मारकाचा उपयोग काय? एवढे मोठे आदरणीय थोर व्यक्ती आहेत ह्या थोर व्यक्तींचा तुम्ही अपमान करता.

दिपक खांबित :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो १५ टक्के जागा जी आहे ती आपली ३०,००० स्क्वेअर मीटर आपल्या ताब्यात आली आहे. त्याच्यावर काढलेली आहे. एकूण ४६,००० आहे त्यापैकी ३०,००० आपल्या ताब्यात आली आहे आणि १५ टक्के ही ३० टक्केवर काढून ते केलेले आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब अतिक्रमण किती आहे.

दिपक खांबित :-

जवळ-जवळ १० ते १५ हजार स्क्वेअर मीटरवर अतिक्रमण आहे. जी जागा ताब्यात आलेली नाही त्याच्यावर आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

आपल्याकडे जी जागा ताब्यात आली आहे त्याच्यामध्ये किती टक्के आरक्षणामध्ये अतिक्रमण झालेले आहे.

दिपक खांबित :-

तशी काही माहिती नाही.........

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम, आणि उपमहापौर साहेब तुम्ही तुमच्या नेत्याच स्मारक बांधत आहे. पण ती जागा ॲक्च्युअली तेवढी शिल्लक नाही. माझ्या माहितीप्रमाणे मोर दॅन ६०-७० टक्के अतिक्रमण झालेले आहे. हार्डली ३०-४० टक्के जागा शिल्लक आहे. त्या जागेमध्ये कसे काय उभारणार. प्रशासनाने गोषवारा देताना परिपूर्ण अहवाल दिला पाहिजे की आमच्याकडे ३०,००० क्षेत्र विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे आलेले आहे. आणि त्याच्यामध्ये एवढे एवढे एन्क्रोचमेन्ट झालेले आहे. आणि एवढीशी जागा शिल्लक आहे त्याच्यामध्ये आपण १५ टक्के देऊ शकतो.

भगवती शर्मा :-

साहब इन्होंने जैसे कहाँ की वो एक रिझर्व्हेशन है सामाजिक वनीकरण भी उसके साथ में है। प्ले ग्राऊन्ड के साथ में सामाजिक वनीकरण है। उसके अंदर गोषवारा में कही उल्लेख नही है। सामाजिक वनीकरण के लिए कितना और प्ले ग्राऊन्ड के लिए कितना है। ऐसी हालत के अंदर में सामाजिक वनीकरण जहाँ रिझर्व्हेशन होता है ऐसी स्थिती के अंदर में वहाँ कोई भी बांधकाम नही कर सकते ऐसे नियम है। सामाजिक वनीकरण के साथ कोई भी छेडछाड नही कर सकते तो पहले उसमें डेफीनेशन नही है की कितना सामाजिक वनीकरण है और कितना उस रिर्झव्हेशन प्लेग्राउन्ड के लिए इसके लिए रिझर्व्हेशन डिव्हायडेशन नही हो सकता तब तक आप गोषवारा के अंदर में नही ला सकते। क्योंकी सामाजिक वनीकरण के अंदर में बांधकाम की परवानगी होती नही कोई भी ॲक्टीव्हिटी नही कर सकते। इसमें पुरा दिशाभूल हुआ है। बडे महापुरुष का स्मारक बनाना है। पहले से ही उसके अंदर में विवाद उत्पन्न हो ऐसी स्थिती में यह सब क्लियर करके उसके बाद कोई कदम उठाते तो बढीया रहता। हमारी यह भावना है की ऐसी महापुरुष की स्मारक बनाने के लिए कुछ भी कमी रह जाए तो हम राष्ट्रवादीवाले सदस्य भी अपनी तरफ से योगदान देने के लिए तयार है। लेकिन प्रशासन गोषवारा के अंदर क्लियर किए बगैर लाना एकदम ही अनुचित है इसका खुलासा करीए।

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम, गोषवाऱ्यामध्ये नमूद आहे. टोटल ३०,००० मीटर जागा आली आहे. १५ टक्के प्रमाणे ४,५८० मीटर हे कन्स्ट्रक्शन उपलब्ध आहे म्हणजे ५०,००० स्क्वेअर फुटपेक्षा जास्त आणि जे प्रस्तावित केले आहे. ते ३८० मीटर आहे. म्हणजे उदा. ३००० मीटर जरी उरले तरी हे काम होऊ शकते. आपल्याकडे ३०,००० मीटर आहे. कन्स्ट्रक्शन परमिसेबल म्हटले आहे तेवढे पण आपण मागणी करतो ३८० मीटर त्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण होणारनाही. म्हणून त्याची जी शंका आहे. त्याच्यात जास्तीचे अतिक्रमण झाले असेल ते असेल भविष्यात ती जागाही ताब्यात घ्यायची आहे. तरीही आपण गृहित धरले २००० मिटर आल्यावर ३०० मीटर होऊन जाते. आपल्याकडे ३०००० मीटर आलेले आहे. एवढ्या जागेत अडथळा निर्माण होणार नाही.

ध्रुवकिशोर पाटील :-

हा खुलासा प्रशासनाने केला पाहिजे पण आमचे आमदार महोदय खुलासा करतात. प्रशासन हे चालवतात का? गोषवाऱ्यामध्ये ३०० मीटर नाहीच आहे.

नरेंद्र मेहता :-

आम्ही त्यावेळी ठराव केला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब आम्हाला तुमच्याकडून खुलासा हवा.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

पाटील साहेब आपको यहाँ से भी खुलासा मिलेगा उन्होंने अपनी तरफ से बोला है। उन्होंने भुमिका मांडी है। त्यांनी त्यांची भुमिका मांडली आहे. त्यांना अधिकार नाही हे तुम्ही सांगू नका. माझ्या परवानगीने उठले आहेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

मी असे म्हणत नाही की त्यांनी तुमची परवानगी घेतली नाही. पण खुलासा प्रशासनानी करायला पाहिजे.

दिनेश नलावडे :-

मा. महापौर मॅडम हा जो विषय आलेला आहे आरक्षण क्र. १२२ त्याचबरोबर आपण जे आरक्षण विकसित करतो. मा. महापौर मॅडम मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो भाईंदर पश्चिमेला शहिद भगतसिंग ह्या देशासाठी महान व्यक्ती आहेत. मॅडम ही गोष्ट मॅक्सस मॉलच्या समोरची शहीद भगतसिंग क्रिडांगण ह्याच्यावर देखील छोटासा बोर्ड लावलेला आहे. कुणाच्याही निदर्शनास हे बोर्ड वाचता येत नाही. ते क्रिडांगण त्यांच्या नावाचे आहे. मी सुचना करतो शहीद भगतसिंग उद्यान आहे. ते उद्यान आज नामशेष होत चालले आहे. त्या उद्यानाकडे महानगरपालिकेचे थोडेही लक्ष नाही. शहिद भगत सिंग ह्यांचा भव्य पूतळा त्याठिकाणी निर्माण करावा ते क्रिंडागण आहे ते बिल्डरला सोपवले आहे ते महानगरपालिकेने ताब्यात घ्यावे. मॅडम त्याचबरोबर आपला अश्वरूढ पूतळा छत्रपती शिवाजी महाराजांचा तेथे आपल्या महानगरपालिकेकडून गेट सुध्दा सुशोभित करता आला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या बाजूचा परिसर सुशोभिंत करण्यात यावा अशी सुचना मांडत आहे.

तारा घरत :-

मा. महापौर मॅडम १२२ आरक्षण पूर्ण खाली झालेले नाही. ते कधीपर्यंत खाली होईल आणि खरोखर खाली होईल का? जे अतिक्रमण आहे ते आणि तिथे गाववाल्याची जागा आहे तो मोबदला त्यांनाच द्यावा.

मा. आयुक्त :-

मा.महापौर मॅडम विषय क्र. ३१ भाईदर पूर्व मौजे गोडदेव आरक्षण क्र.१२२ ह्या जागेत हिंदू हृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन ह्यांचे स्मारक उभारणेबाबत विचारविनिमय करून निर्णय घेणे बाबत. शर्माजी आपण सिनियर मोस्ट नगरसेवक आहेत ख-या अर्थाने ही शंका राहायला नाही पाहिजे. कारण ह्यापूर्वी आपण बरेचसे आरक्षण डेव्हलप केलेले आहेत. डी.पी.मध्ये रिझर्व्हेशन असतो. स्कुल अॅन्ड प्ले ग्राऊंड त्याच्यासाठी शाळेसाठी जागा किती आणि प्लेग्राऊन्डसाठी किती जागा हे लिहिलेले असते परंतू स्कूल आणि प्लेग्राऊन्ड अशी जागा असेल तर त्या आरक्षणामध्ये अडीच एकर जागा आहे तर त्या अडीच एकरच्या १५ टक्के बांधकाम हे अनुज्ञेय आहे. म्हणजे जे काही बांधकाम करणार आहात त्याच्यामध्ये स्कूल होईल बाकीचे मैदान राहील हे जे आरक्षण आहे ह्या आरक्षणामध्ये आपण प्रश्न विचारला की सोशल फॉरेस्टी आहे. त्याचा खुलासा करू इच्छितो ह्या ठिकाणी जे आरक्षण आहे त्यात जेवढे आरक्षण आहे त्याच्या १५ टक्के बांधकाम अनुज्ञेय आहे. आणि १५ टक्के बांधकामाच्या व्यतिरिक्त जे क्षेत्र राहील त्याच्यामध्ये आपण सोशल फॉरेस्टीचे प्लान्टेशन करणारच आहोत ते आपल्याला बंधकारक आहे. आणि १५ टक्के अनुज्ञेय बांधकाम आहे त्याच्यामध्ये आपण ठराव घेतल्यानंतर त्याठिकाणी स्मारकाचे वैशिष्ठ्य काय राहणार आहे कशा पध्दतीने राहणार आहे हे महासभेने निर्णय घेतल्यानंतर करणार आहोत सर्वात महत्वाचा मुद्दा जे अतिक्रमणाबद्दल बोलता जे १२२ मध्ये आता खांबित साहेबांनी सांगितले जेवढे क्षेत्र आपल्या ताब्यात आले आहे. माझ्या माहितीप्रमाणे कम्पाऊंड वॉलदेखील अर्ध्याच्या वर झालेली आहे आणि जेवढ क्षेत्र आमच्या ताब्यात आलेले आहे ह्या क्षेत्राच्या ५० टक्के आपण काढलेले आहे आणि उर्वरित क्षेत्र ताब्यात घेणे बाकी आहे. त्याठिकाणचे अतिक्रमण १०० टक्के काढण्यात येईल आणि १०० टक्के कम्पाऊन्ड वॉलचे काम झाल्यानंतरच ह्या कामाला सुरूवात करण्यात येईल.

भगवती शर्मा :-

साहेब मैने इसके लिए बोला की प्लेग्राऊन्ड में स्कूल लिखा रहता है उसके अंदर अलग अलग नही होता है। १०० टक्के आपकी बात सच है। सामाजिक वनीकरण जहॉपे लिखा जाता है वहॉ पे आप डेव्हलपमेन्ट नही कर सकते उसका उदा. बताता हूँ इसी सभागृह के अंदर मे इसका एक बार प्रस्ताव गया है। वो वापिस आया है। सरकार ने प्रस्ताव मांगा था। प्रशासनने यहॉ पे ठराव करके दिया।

मा. आयुक्त :-

त्याठिकाणी खेळाचे मैदान आणि सामाजिक वनीकरण असे कम्बाइन्ड आरक्षण आहे. खेळाचे मैदान मध्ये १५ टक्के जागा बांधकामासाठी अनुज्ञेय आहे आणि राहीलेल्या जागेमध्ये आपण सामाजिक वनिकरण करणार आहोत आपल्या मताशी मी कधी सहमत आहे जर १०० टक्के सामाजिक वनीकरणचे आरक्षण असत तर त्याठिकाणी बांधकाम करता आले नसते पण ह्या ठिकाणी खेळाचे मैदान आणि सामाजिक वनीकरण असे आरक्षण आहे खेळाचे मैदान आहे त्याच्यामध्ये फक्त १५ टक्के बांधकाम आपल्याला अलाऊड आहे. त्या १५ टक्के मध्ये स्मारक उभे करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब तुम्ही जो खुलासा केला त्याच्यामध्ये १०० टक्के पकडले की ३०,००० चे १५ टक्के होतात ४,५०० आणि ते ह्याच्यामध्ये म्हटलेले आहे. जर सामाजिक वनीकरण ५० टक्के असेल आणि प्ले ग्राऊंड पण ५० टक्के असेल तर प्ले ग्राऊंडच्या १५ टक्के बांधकाम अनुज्ञेय आहे. सामाजिक वनीकरणाच्या नव्हे साहेब तुम्ही खात्री करा. साहेब आमची शंका आहे तुम्ही खात्री करा. साहेब तुम्ही म्हटल त्याच्यातून अतिक्रमण हटवले सन्मा. नगरसेविका तारा घरत ह्या त्या वॉर्डच्या नगरसेविका आहेत त्यांना विचारा तिथे भरपूर अतिक्रमण झालेले आहे. अतिक्रमण हटवण्याची कारवाई अजिबात झालेली नाही.

मा. आयुक्त :-

मी स्वतः स्पॉट बघून आलेलो आहे. त्या ठिकाणी जे इंडस्ट्रीचे होते ते सगळ हटवायचे काम झालेले आहे. २-३ इंडस्ट्रीमध्ये स्टे आहे. म्हणून थांबलेले आहे बाकीचा सगळा प्लान झालेला आहे आणि ते अतिक्रमण काढल्यानंतर पूर्ण कम्पाऊन्ड वॉल झाल्यानंतरच कामाचे चालू करणार आहेत.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब, आम्हाला हे मंजूर आहे तुम्ही बघा किती जागा अव्हेलेबल आहे.

मा. आयुक्त :-

आपला ठराव झाल्यानंतर बरेच प्रोसेस आहे. पदाधिका-याच्या समितीमध्ये जाणार शासनाकडे जाणार तिकडून मंजूरी होऊन येणार तोपर्यत आमच काम होऊन जाईल.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब, त्यांच्या अगोदर हे लोक टेंडर काढतील आणि कन्सल्टंट टंडन डोक्यावर बसेल फी घेऊन निघून जाईल आणि तुम्हाला प्लान सादर करेल तुमच्या हेडमध्ये तुम्ही किती तरी फीज टंडन असोसिएटला दिली आहे साहेब त्या लोकांच्या कन्सल्टन्सीवर आपला अजिबात अभ्यास नाही बसेसमध्ये आपण एवढी फी दिलेली आहे त्याचा आपण काही उपयोग केला नाही.

मा. आयुक्त :-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचा आपण ठराव घेतला. पास केला प्रस्ताव शासनाला पाठवला आम्ही पाठपुरावा केला आणि आता त्याचे उद्‌घाटन होते प्रोसेसला वेळ लागतो. त्याच्यामुळे अस काही म्हणवून घ्यायचे कारण नाही.

मा. महापौर :-

ध्रुवकिशोरजी इन्होने यह खात्री दि है की आपका अतिक्रमण फ्रि होगा उसके बादही कन्सल्टंट.................

ध्रुवकिशोर पाटील :-

जी जागा शिल्लक राहील त्याच्या १५ टक्के अनुज्ञेय आहे.

मा. आयुक्त :-

नियमाप्रमाणे जी अनुज्ञेय असेल ते केल जाईल.

मा. उपमहापौर :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, आपण आरक्षण बोललात मान्य आहे आपण नियमाप्रमाणे बोललात परंतू आरक्षण क्र.१२२ ह्याच्यामध्ये मा. बाळासाहेब ठाकरेचे स्मारक व्हावे अशी मी सर्व सभागृहाला विनंती करतो. जेणेकरून आपण दिलेले शर्मासाहेबांनी आणि तुम्ही सांगितलेले नियम त्याच्या नियमाच्या अधीन राहून हे स्मारक होईल अशी मी प्रशासनाला विनंती करतो. कोणत्याही नियमांचे उल्लघंन होणार नाही. ह्याची आम्ही काळजी घेणार.

ध्रुवकिशोर पाटील :-

आरक्षण क्र. ११९ या जागेत बांधण्यात आलेल्या क्रिडा संकुलाजवळ स्वर्गीय प्रमोद महाजन ह्यांचे स्मारक उभारण्याची आपण परवानगी मागीतली आहे. साहेब आरक्षण क्र. ११९ मध्ये १५ टक्के क्रिडा संकूल बांधलेले आहे.

नरेंद्र मेहता :-

आम्ही जो ठराव केला आहे तो चेंज केला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब प्रशासन म्हणते ११९ मध्ये क्रिडासंकुल मध्ये ते बांधायचे आहे. क्रिडा संकूलनाचा अख्खा एफ एस आय १५ टक्के युज केलेला आहे. मग हा गोषवारा प्रशासनाने कसा दिला. प्रशासन अभ्यास करत नाही का ? हा चूकीचा का देतो? आपण त्यांना पगार देतो त्यांच्याकडे कॉलीफिकेशन आहे मग चुकीचे का देतात आणि टाऊन प्लांनिग डिपा. आणि बांधकाम डिपा. मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अंडर मध्ये येते.

नरेंद्र मेहता :-

मा. महापौराच्या परवानगीने कमीत कमी ध्रुवकिशोर पाटीलनी स्पोर्टस कॉम्पलेक्सबद्दल नाही बोलल तर बर होईल.

ध्रुवकिशोर पाटील :-

हा गोषवारा चूकीचा आहे की बरोबर आहे ते मला सांगा. तुम्ही समर्थन करता ना.

नरेंद्र मेहता :-

स्पोर्टस कॉम्पलेक्स जो बांधलेला आहे प्रशासनकडून तरी विषय आला असेल आम्ही आमच्या सदबूध्दीचा उपयोग करून आम्ही तो ठराव वेगळ्या आरक्षणामध्ये दिलेला आहे आज जेव्हा अभ्यास केला त्यावेळी आम्ही वांरवार ते सांगितले कन्स्ट्रक्शन १५ टक्के पेक्षा जास्त नाही त्या आरक्षणामध्ये आपण मोजा मागे १५ टक्के एस.टी.पी. झालेले आहे आणि १५ टक्के पेक्षा जास्त स्पोर्टस कॉम्पलेक्स ३० टक्के पेक्षा जास्त काम झालें आहे. आणि त्यामध्ये एकमात्र कोणी हट्ट धरला असेल तर ते ध्रुवकिशोर पाटील होते. स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधा ३० कोटी खासदार निधीतून मिळणार ह्या अटीशर्तीवर दिले तर ६ कोटी आले उरलेले पैसे आले नाही. स्पोर्टस कॉम्पलेक्स वेगळं नाही. त्या १५ टक्के पेक्षा, ३० टक्के पेक्षा जास्त कन्स्ट्रक्शन आहे चेक करून बघावे. प्रशासनानी खुलासा करावा. ठराव आम्ही नाही केला आपणच केला

आहे त्यावेळी कॉंग्रेस पक्षाने सांगितले होते की त्या ठिकाणी करू नये पण आपण हट्ट धरून त्याच ठिकाणी करा आणि ३० टक्केपक्षा जास्त कन्स्ट्रक्शन त्याठिकाणी केलेले आहे.
(सभागृहात गोंधळ)

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम ३० टक्का होने के बावजूद के अंदरमें यह बोल रहे है की ध्रुवकिशोर पाटील उस समय उनकी सत्ता थी इन्होने गलती की आज सत्ता किसकी है। ३० टक्का होने के बावजूद भी आज प्रस्ताव लाया जा रहा है। यह किसकी गलती है यह गोषवारा किसने लाया।

ध्रुवकिशोर पाटील :-

मूझे ऐसा लग रहा है की गोषवारा आमदार साहेबही बना रहे है और प्रशासन को भेज रहे है।

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम ह्या विषयाचा चर्चेशी काही संबध येत नाही.

दिपक खांबित :-

११९ मध्ये जे स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधले आहे ते १५ टक्के च्या मर्यादे मध्येच आहे जी जागा त्यावेळेला ताब्यात होती त्याच्या १५ टक्के आहे. आणि त्यानंतर सुध्दा त्या मधला आरक्षणचा काही भाग आपल्या ताब्यात आलेला आहे. त्यामध्ये प्रस्ताव केलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

बरोबर ना म्हणजे मेहता साहेब बोलतात ते खोट की नाही. ते ३० टक्के म्हणतात. दूध का दूध पाणी का पाणी इधर हो गया। एक्झीकेटीव्ह इजि. बोल दिया की १५ टक्क़े के अंदर बांधकाम किया हमने कोई गलत काम नही किया।

दिपक खांबित :-

त्यानंतरही काही  जागा आपल्या ताब्यात आलेली आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब आम्ही जे केले ते बरोबर केले.

मा. आयुक्त :-

त्यानंतर ताब्यात आलेल्या जागेमध्ये १५ टक्के मध्ये तो विषय टाकलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

साहेब आता तो विषय चेंज केला का?

नरेंद्र मेहता :-

आरक्षण चेंज केले.

वंदना चक्रे :-

मा.महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब बोलले की डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा पूतळा बसला. बाबासाहेब आंबेडकराच्या पूतळयासाठी आपण प्रयत्न केला. मा. आयुक्त महोदय आपल्याला माहित आहे. सभागृहाला सांगू इच्छिते पत्रकार बंधू आणि भगिनिना सांगू इच्छिते अनेक वर्षापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या पूतळ्यासाठी मी प्रयत्न केले.

मा. महापौर :-

तो विषय नाही.

वंदना चक्रे :-

सचिव, प्रधान सचिव,कलेक्टर आणि आपल्यापर्यत विषय देऊन ते फॉलोअप केला त्याच्यात माझा फार मोठा सहयोग आहे. आपण इथे हे सांगायची गरज नाही. लोकांना कळू द्या माहित पडल पाहिजे. ही सुचना इथे देण्याची गरज होती. सांगण  फार म्हत्वाचे होते. माझी ही सुचना समाविष्ठ करून घ्यावी.

आसिफ शेख :-

मा. महापौर मॅडम आज आपला वाढदिवस आहे मी आपले अभिनंदन करतो. आप जियो हजारो साल साल के दिन हो ५० हजार. आपल्या ज्या मनोकामना, इच्छा असतील त्या पूर्ण होवो. आज आपण ३१ क्र. चा विषय आणला. भाईदर पूर्व मौजे घोडबंदर, गोडदेव आरक्षण १२२ हे ह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व प्रमोद महाजन ह्यांचे स्मारक बांधणे बाबत विचारविनिमय करणे. दिवंगत नेते बाळासाहेब ठाकरे आणि प्रमोद महाजन ह्यांचे फार मोठे योंगदान आहे. ह्या संपूर्ण राज्यात आहे, देशात त्याचे मोठे योगदान आहे. पण ह्या ठिकाणी मी आपणास सुचना करू इच्छितो की, असाच एक संदर्भ राष्ट्रपिता म. गांधी ईश्वर अल्ला तेरो नाम सबको संम्मती दे भगवान तो विषय महासभेत आला होता. ''ज'' चा प्रस्ताव आला होता. आमचे सन्मा. मित्र नरेंद्र मेहता ह्यांनी सांगितले विषय चांगला आहे तर रितसर विषय घेऊन सभागृहापूढे आणा. ३ महिने गेले तरी आणला नाही. मागच्या महासभेत देखील ''ज'' चा प्रस्ताव आणला होता. त्यावर आपण काहीच निर्णय घेतला नाही. आमचे असे म्हणणे आहे की प्रशासनाने ह्या संदर्भात टिप्पणी तयार आहे. जागा आपल्या ह्या महानगरपालिकेच्या ह्या मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या शेजारी अर्धपूतळा

उभारण्यास रितसर टिप्पणी तयार आहे. प्रशासनाची मान्यता आहे. काही अडचण नाही. ह्या विषयाबरोबरच राष्ट्रपिता महात्मा गांधी ह्यांच्याही पूतळ्याचा प्रस्ताव द्यावा. प्रशासनाची पूर्ण मान्यता आहे.

मा. महापौर :-

आसिफ शेख आपको बता दू आपका विषय आया था आप गैरहजर थे।

आसिफ शेख :-

मैं पिछली महासभाकी बात नही कर रहा हूँ। ४ महिने पहले जो महासभा हुई थी उसमे हमने प्रस्ताव दिया था। उसमे आपने कहॉ हमारे परममित्र ने कहा की आपने बहोत अच्छा प्रस्ताव लाया उस समय आप बोली थी प्रस्ताव अच्छा है रितसर प्रस्ताव महासभामें लेकर आओ। लेकीन हमारे प्रस्ताव ऐसे नजर अंदाज करोगे तो अच्छी बात नही है।

मा. महापौर :-

हम नजरअंदाज कर नही सकते बहोत जल्दी आपका प्रस्ताव लाया जायेगा।

आसिफ शेख :-

प्रशासन के पास टिप्पणी तयार है।

मा. महापौर :-

आज तो विषय नही लाया जायेगा।

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

आसिफजी आप से बिनती है आज के विषयपे चर्चा करे।

सुहास रकवी :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, ३१ नं. चा विषय खरोखर चांगला आहे. त्याच्यावर ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी सुध्दा चर्चा केली. शर्माजी आमदारांनी सुध्दा निवेदन दिले पण आमचे उपमहापौर ह्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण जर हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांचे जर स्मारक उभे करायचे असेल तर ते कोणत्या पध्दतीने करायचे ते मा. आयुक्तांना माहित असेल. आणि त्याची संपूर्ण गोषवाऱ्यामध्ये माहिती आहे. चांगल्या पध्दतीने होईल त्याचप्रमाणे प्रमोद महाजन ह्यांचे देखील स्मारक करायचे ह्याकरिता आपण नियमात बसून त्या अटीशर्तीमध्ये बसून ते स्मारक सुंदर आणि चांगले त्याचे स्वरूप,त्याचा कोणत्या पध्दतीने तांत्रिक सल्लागार नेमणार ह्याचे पूर्ण अभ्यासपूर्वक करा. ते आपल्या मिरा भाईदर करिता एक वेगळी आयडेन्टीटी होईल की स्मारक ह्या ठिकाणी ह्याच्याकरिता आम्ही तुम्हाला सुचना करतो की हे स्मारक झाले पाहिजे त्याच्याकरिता निधी कमी नाही पडला पाहिजे. ध्रुवकिशोर पाटील म्हणाले निधी लागला तर आमचा जो वैयक्तिक निधी आहे तो आम्ही देऊ अशा पध्दतीने चांगल स्मारक व्हाव अशी आमच्या पक्षाची इच्छा आहे. त्याकरिता आपण प्रयत्न करावा ही आमची विनंती सुध्दा आहे.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम अच्छी बात है प्रशासनने विषय लाया ठाकरे साहब का लाया, प्रमोद महाजन का लाया आगे भी और विषय है मेरी आपसे गुजारिश है. आपके माध्यमसे प्रशासनसे की महाराष्ट्र की धरती पे ऐसे बडे बडे महापूरुष हूये है। जिनके नाम महासभामें बताना चाहता हूँ। इसके आगे इस नामो पर सहानूभूतीपूर्व विचार करके इसके आगे जो भी रिझर्व्हेशन है उनके अंदर मे इनके नामकरण इनके पूतले बिठाने का काम करेंगे। निश्चित रूपसे हम कह सकेंगे महाराष्ट्र की धरतीपर रहते है इस महाराष्ट्र का धरती का सन्मान करते है। मा. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, मा.महात्मा ज्योतिबा फूले, मा. सवित्रीबाई फूले, मा. छत्रपती संभाजी राव भोसले, मा.जिजामाता भोसले, मा. संत तुकाराम महाराज, मा. संत ज्ञानेश्वर महाराज, मा. संत नामदेव, मा. बाबा आमटे, मा. क्रांतीसिंह नाना पाटील, मा. गोपाळकृष्ण गोखले, मा. छत्रपती शाहू महाराज, मा. संत गाडगे महाराज, मा. आचार्य अत्रे साहेब, मा. प्रबोधनकार ठाकरेसाहेब ,मा. बाजीराव पेशवे, झाशीची राणी लक्ष्मीबाई हो सकता है कुछ नाम छूट गये होंगे। कोई बताना चाहता है तो बता सकते है। इस नामोपर प्रशासन सहानुभूतीपूर्वक विचार करेंगे तो निश्चीत रूपसे इस धरती का हम सम्मान करेंगे।

प्रशांत दळवी :-

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, मिरा भाईदर क्षेत्रामध्ये गोडदेव आरक्षण क्र. १२१,१२२ ह्या ठिकाणी सन्मा. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांचे स्मारक व्हावे अशी तीव्र इच्छा मा. महापौर मॅडम ह्या संपूर्ण जनतेची आहे. ह्या मंगळवारी आजच्या ५ तारखेच्या सभेमध्ये ठराव येणार म्हणून मिरा भाईदर जनतेची उत्सूकता लागली आहे. परंतू काही ना काही कूठेतरी खो घालायचा विरोधात बसले म्हणून विरोध करायचा असे न करता माझी प्रामुख्याने इच्छा आहे शिवसेना भारतीय जनता पार्टी हे दोन्ही शिल्पकार १२२ आरक्षणामध्ये जरी अतिक्रमण वाढले असेल मला वाटते आयुक्त महोदयानी शब्द दिला की ह्याठिकाणी आरक्षणामध्ये अतिक्रमण होत असेल किंवा झालेले असेल ते पूर्णतः काढले जाईल त्या ठिकाणी भव्य दिव्य असे आदरणीय बाळासाहेबांचे स्मारक उभारण्यात यावे. ह्याच्या अगोदर देखील काही ठराव महानगरपालिकामध्ये पास झालेले आहेत. त्याठिकाणी अतिक्रमण होते सगळे हटवण्यात आले आणि ते सुशोभिकरण करण्यात आले. माझी सभागृहाला विनंती राहणार आहे की, सभागृहाच्या सर्व सदस्यांनी

सर्वानुमते आदरणीय बाळासाहेबाचा आणि प्रमोद महाजन ह्यांचा जो विषय आहे तो विषय सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात यावा अशी मी महापौर आपणास विनंती करतो.

प्रभात पाटील :-

मा. महापौराच्या परवानगीने बोलते आज आपण बऱ्याचश्या पूतळ्याच्या परवानग्या आपण देतो.

मा. महापौर :-

बऱ्याचशा नाही दोनच आहेत.

प्रभात पाटील :-

पुढे पण २ आहेत ना. आसिफ शेखनी आणखी एक प्रस्ताव ठेवला. ह्यांनी तर यादीच वाचून दाखवली. माझी फक्त एक सूचना आहे. मिरा भाईंदरमध्ये भरपूर आरक्षण आहेत एक आरक्षण फक्त पूतळ्यासाठी ठेवा हे विषय आणूच नका एक रिझर्व्हेशन त्याच्यासाठीच ठेवा सगळे पूतळे तिकडे आपण क्रमाने बसवू या. प्रत्येकाची पूण्यतिथी जयंती जेव्हा येईल तेव्हा एकच ठिकाणी ठिकाण आणि पत्ता देण्याची गरज नाही. त्याठिकाणी जायचे आणि त्यांची पूण्यतिथी जयंती साजरी करायची.

(सभागृहात गोंधळ)

ध्रुवकिशोर पाटील :-

ठरावाला आमचा सपोर्ट आहे विरोध नाही.

नरेंद्र मेहता :-

ताई आपल्याला बोलायला पूर्ण अधिकार आहे परवानगी आहे. महापुरुषाचे आपण जे भाष्य केल ते मला वाटत नाही आपण त्याला सन्मान देण्यासाठी केला. सगळ्यांना एका लाईनीमध्ये...........

प्रभात पाटील :-

माझे पूर्ण ऐकलेच नाही.

नरेंद्र मेहता :-

अस कस बोलू शकता. तुम्ही बोलता सगळ्याचे पूतळे एका मैदानात लावून टाका.

प्रभात पाटील :-

माझे ऐकलच नाही.

नरेंद्र मेहता :-

असे नाही ऐकून घेणार.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम एका बाजूला आदरणीय दिवंगत ह्रयसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या स्मारकाला परमिशन देण्यासंदर्भात हा विषय आहे. दुसरा विषय आहे तो पूतळ्याचा विषय आहे. त्यामुळे पहिला विषय पूर्ण करण्यात यावा. अशी मी विनंती करते.

मा. महापौर :-

ठराव मी सर्वानुमते मंजूर केला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

सुचनेसह.

मा. महापौर :-

सुचना नाही.

वंदना चक्रे :-

माझी सूचना घ्या.

मा. महापौर :-

मी कोणाची सूचना घेतली नाही.

प्रकरण क्र. ३१ :-

भाईंदर (पूर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र. १२२ या जागेत हिन्दु हृद्‌यसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ३० :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.१२२ खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरणासाठी राखीव असून सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र ४६,७०० चौ.मीटर आहे. त्यापैकी विकास हक्क प्रमाण पत्राव्दारे ३०५३३.६० चौ.मीटर जागा महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे. सदर ताब्यातील क्षेत्राच्या १५% च्या मर्यादेत म्हणजेच ४५८०.०४ चौमीटर क्षेत्रावर बांधकाम अनुज्ञेय आहे. तसेच भाईंदर (पुर्व) मौजे गोडदेव आरक्षण क्र.१२२ या जागेतहिन्दू हृदय सम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे स्मारक अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार व आर्थिक तरतुद कमी पडल्यास वेगळ्या लेखाशिर्षामधून पुर्नविनियोजन करुन तसा खर्च करण्यांत यावा. तसेच सदर स्मारके उभारण्यासाठी सल्लागार, शिल्पकाराची नेमणुक करणे, तसेच खर्चास ही सभा मान्यता देत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. हरिश्चंद्र आमगावकर अनुमोदन :- श्रीम. तारा घरत

सदर ठरावात सुचक श्री. नरेंद्र मेहता व अनुमोदन श्री. शरद पाटील यांचा ठराव क्लब करण्यांत येत आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेत आरक्षण क्र.३३५ बगिचा अथवा आरक्षण क्र.३०० खेळाचे मैदान या जागेत स्वर्गीय प्रमोद महाजन यांचे स्मारक उभारण्यात यावे. याकरीता स्मारके उभारण्यासाठी अनुभवी तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करावी लागणार असून त्यांच्या मार्फत कामाचे आरखडे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करावे लागणार आहे. सदर स्मारके उभारण्यासाठी मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर नागरी क्षेत्रात स्मारके उभारण्यास परवानगी देणेसाठी मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती समोर प्रस्ताव पाठवावा लागेल व सदर समितीच्या शिफारसी वरुन शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सदर काम हाती घ्यावे लागेल. प्रशासनाचा उपरोक्त प्रस्ताव पाहता प्रस्तावित स्मारके उभारण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर स्मारके उभारण्यासाठी सल्लागार, शिल्पकाराची नेमणुक करणे, शासकीय मान्यता घेणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त यांना देत आहे तसेच सदर कामी होणाऱ्या खर्चास ही सभा मान्यता देत आहेत असा मी ठराव मांडत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३२, भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

देशाच्या पारतंत्राच्या काळामध्ये देशास स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी कठोर परिश्रम केले, हालअपेष्टा सोसल्या, कारावास भोगला व आपला देशास स्वातंत्र्य मिळवून दिले. अशा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल या थोर नेत्यांचे भावी पिढीस स्मरण व्हावे त्यांच्या कर्तव्याची जाण यावी या उदात्त हेतूने देशामध्ये अनेक ठिकाणी त्यांचे स्मारके, पुतळे उभारले तसेच स्वातंत्र्योत्तर काळात ज्यांनी देशाच्या क्षेपणास्त्राच्या निर्मितीमध्ये भरीव कामगिरी केली व ज्यांना मिसाईल मॅन तसेच लोकांचे राष्ट्रपती म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये या दोन महान पुरुषांचा समावेश होतो अशा महापुरुषांचे मिरा भाईंदर हद्दीमध्ये यथोचित पुतळे उभारावे हे आम्हा सर्वांचे कर्तव्य म्हणून मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क येथील आरक्षण क्र. १२२-अ या चौपाटीच्या आरक्षणात भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा पुतळा तसेच मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.१८७, बगीचा या ठिकाणी असलेल्या जॉगर्स पार्क मध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा बसविण्याचे प्रस्ताव आले आहेत. सदर आरक्षणाच्या एकूण जागेपैकी १५% जागेवर बांधकाम अनुज्ञेय आहे. तथापी सदर पुतळे उभारण्यासाठी अनुभवी सल्लागारांची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत आराखडे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन सक्षम मान्यता घ्यावी लागेल. तसेच मा. महासभेच्या मान्यतेनंतर मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती समोर प्रस्ताव पाठवुन शासनाच्या मान्यतेने अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सदर कामे हाती घ्यावी लागतील. प्रशासनाचा उपरोक्त प्रस्ताव पाहता प्रस्तावित ठिकाणी पुतळे बसविण्याच्या दृष्टीने सल्लागार तसेच पूतळा तयार करणाऱ्या शिल्पकारांची नेमणूक करणे, आवश्यक त्या शासकीय परवानग्या प्राप्त करणे, अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करून कामे हाती घेणे व सदर कामासाठी येणाऱ्या खर्चास तसेच प्रस्तावित मान्यवरांचे पूतळे बसविण्यास ही सभा मान्यता देत आहे तसेच याकामी आवश्यक ती कामे करीण्याकरीता सर्व अधिकार आयुक्तांना देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

निलम ढवण :-

मा. महापौर ह्या ठरावाला माझी सुचना आहे. विशेष महासभा सुचना दि. ५/०७/२०१६ ची सभासुचना प्रकरण ३२ आता जो ठराव केलेला आहे त्यानुसार महाराष्ट्राच्या मातीतील काही थोर महान पुरुषांची देखील पुतळ्याचा ह्याच्यात समावेश करुन घ्यावा अशी मी आपणांस विनंती करते. १. माता जिजामाता ह्यांचा मिरारोड स्टेशन बाहेर, शांतीनगर हॉटेलच्या समोर २. लोकमान्य टिळक, मॅक्सेस मॉल चौकी जवळ ३. सावित्रिबाई फुले नवघर मैदान ४. वि.वा. सावरकर ह्यांचा सावरकर चौक, गोल्डन नेस्ट येथे महाराष्ट्राच्या मातीतील ह्या महापुरुषांचे पुतळे बांधण्यात यावे अशी मी सुचना मांडत आहे ह्याचा समावेश करण्यात यावा.

प्रभात पाटील :-

आमदार साहेब मी काय चूकीचे बोलले. ते आता सांगा.

नरेंद्र मेहता :-

मी त्यावेळी हे नाही बोललो की पूतळे उभारु नका.

प्रभात पाटील :-

मी पण तसे बोलले नाही.

नरेंद्र मेहता :-

यादी वाचल्यावर आम्ही आक्षेप केला तुम्ही महापुरुषाची नाव घेतली तुम्हाला अधिकार आहे. आपण सांगितले की सर्वांना एका मैदानात उभे करा. ह्यासाठी माझा आक्षेप होता. सर्वांना एका मैदानात बसवा हा शब्द त्यासाठी माझा आक्षेप होता.

वंदना चक्रे :-

आमदार साहेब सावित्रीबाई फुले छोट्या नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

सावित्रीबाई फुलेंचा समावेश केलेला आहे आमच्या एरियात आहे.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम, हमारी सुचना अगर अच्छी नही थी तो फेटालने का आपका अधिकार है। लेकिन उन्ही सुचना को वही नाम मा. महापौर मॅडम आज आपसे बहुत अपेक्षा है आज आपका जन्मदिन है आज सभागृह में अच्छे अच्छे काम हो कोई भेदभाव न हो इसका पूर्ण ख्याल रखा जाए। मा. महापौर मॅडम दुसरी बात आरक्षण क्र. १८७ दिया गया है जैसे १२२ के अंदर में ४७ में मेरा आपसे एक निवेदन है की १८७ के अंदर में जॉगर्स पार्क का जो रिर्झव्हेशन है वो कितना है कितना आया हुआ है। उसके अंदर कितना अतिक्रमण या अनधिकृत बांधकाम क्या-क्या है उसकी वस्तुस्थिती बताऐंगे तो अच्छा रहेगा।

मा. महापौर :-

शर्माजी इसके पहले अभी कमिशनर साहब बोले की हम कोई भी ॲक्शन तभी लेंगे जब वो हमारे हाथ में सब अतिक्रमण हटा देंगे।

भगवती शर्मा :-

१८७ में हुए है तो उनकी जानकारी होनी चाहिए।

मा. महापौर :-

अतिक्रमण हटेगा हमे क्लियर मिलेगा तभी वो आगे प्रोसेस करेगा उन्होंने पहले ही कहाँ है तो मुझे लगता है आप सभी को बैठ जाना चाहिए। आप सभी को मालूम है की कल के कल कुछ होनेवाला नही है।

जुबेर इनामदार :-

मला ठरावाच्या बाजूने बोलायचे आहे म्हणून मला संधी द्यावी.

आसिफ शेख :-

आज आपला वाढदिवस आहे त्यामुळे आपण सगळ्यांना संधी देणार त्यात दुमत नाही. आपल्या मनात ज्या-ज्या इच्छा आहेत त्या-त्या पूर्ण करण्यासाठी जे सहकार्य लागेल ते आम्ही निश्चितपणे देऊ. आमचे एवढेच म्हणणे आहे की संपूर्ण मानवजातीला ज्याने संदेश दिलेला आहे असे आपल्या देशाचे थोर समाजसुधारक ह्यांचाही आपण ज्या-ज्या ठिकाणी पुतळे बसवणार आहेत.

मा. महापौर :-

मी सर्वांना विनंती करते ज्यांचे जिथे-जिथे जे करायची भावना आहे ते लेटरनी कळवावे. जे पॉसिबल असेल ते प्रशासन नक्कीच करणार.

सुहास रकवी :-

राष्ट्रपुरुषाची यादी तुमच्याकडे असते आपण प्रायोरिटी कोणाला द्यावी लिस्ट भरपूर आहे. मॅडम आरक्षण कमी आहेत.

मा. महापौर :-

म्हणूनच सांगितले जे-जे पॉसिबल असेल...........

(सभागृहात गोंधळ)

आसिफ शेख :-

आपले जे विशिष्ठ समाजसुधारक आहेत..............

मा. महापौर :-

आसिफजी मैंने अभी कहा आप अपने लेटर पे जो जो भावनाए है आप दे दिजीए। प्रशासन के लिए जो पॉसिबल होगा उसके लिए जरुर काम करेंगे।

(सभागृहात गोंधळ)

आसिफ शेख :-

सभागृह में बोलने का जो अधिकार है उसका हनन मत करिए ना।

मा. महापौर :-

मैंने हनन नही किया मैंने यह कहाँ आपका जो सुझाव है उसका यहाँ पे निर्णय नही लेंगे।

आसिफ शेख :-

निलम ताईने लिखके दे दिया।

निलम ढवण :-

आता लिहून दिले आणि ह्याच्यापूर्वी ही मागणी केली आहे.

(सभागृहात गोंधळ)
भगवती शर्मा :-

आम्ही वाचलेली पण सूचना घ्या.

प्रकरण क्र. ३२ :-

भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम तसेच लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारणेबाबत.

ठराव क्र. ३१ :-

देशाच्या पारतंत्राच्या काळामध्ये देशास स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक महापुरुषांनी कठोर परिश्रम केले, हालअपेष्टा सोसल्या, कारावास भोगला व आपला देशास स्वातंत्र्य मिळवून दिले. अशा लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल या थोर नेत्यांचे भावी पिढीस स्मरण व्हावे त्यांच्या कर्तव्याची जाण यावी या उदात्त हेतूने देशामध्ये अनेक ठिकाणी त्यांचे स्मारके, पुतळे उभारले तसेच स्वातंत्र्योत्तर काळात ज्यांनी देशाच्या क्षेपणास्त्राच्या निर्मितीमध्ये भरीव कामगिरी केली व ज्यांना मिसाईल मॅन तसेच लोकांचे राष्ट्रपती म्हणून ओळखले जाते. त्यामध्ये या दोन महान पुरुषांचा समावेश होतो अशा महापुरुषांचे मिरा भाईंदर हद्दीमध्ये यथोचित पुतळे उभारावे हे आम्हा सर्वांचे कर्तव्य म्हणून मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसलपार्क येथील आरक्षण क्र. १२२-अ या चौपाटीच्या आरक्षणात भारतरत्न माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा पुतळा तसेच मिरारोड (पूर्व) आरक्षण क्र.१८७, बगीचा या ठिकाणी असलेल्या जॉगर्स पार्क मध्ये लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा बसविण्याचे प्रस्ताव आले आहेत. सदर आरक्षणाच्या एकूण जागेपैकी १५% जागेवर बांधकाम अनुज्ञेय आहे. तथापी सदर पुतळे उभारण्यासाठी अनुभवी सल्लागारांची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत आराखडे, नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन सक्षम मान्यता घ्यावी लागेल. तसेच मा. महासभेच्या मान्यतेनंतर मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती समोर प्रस्ताव पाठवुन शासनाच्या मान्यतेने अर्थसंकल्पातील तरतुदीनुसार सदर कामे हाती घ्यावी लागतील. प्रशासनाचा उपरोक्त प्रस्ताव पाहता प्रस्तावित ठिकाणी पुतळे बसविण्याच्या दृष्टीने सल्लागार तसेच पूतळा तयार करणाऱ्या शिल्पकारांची नेमणूक करणे, आवश्यक त्या शासकीय परवानग्या प्राप्त करणे, अर्थसंकल्पात आवश्यक तरतूद करून कामे हाती घेणे व सदर कामासाठी येणाऱ्या खर्चास तसेच प्रस्तावित मान्यवरांचे पूतळे बसविण्यास ही सभा मान्यता देत आहे तसेच याकामी आवश्यक ती कामे करीण्याकरीता सर्व अधिकार आयुक्तांना देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३३, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक बेट देखभाल व दुरुस्ती कामाबाबत.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी विकासामार्फत खालील ठिकाणी वाहतूक बेट बांधण्यात आलेली असुन त्याची देखभाल व दुरूस्ती खालील संस्थामार्फत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ठिकाण | संस्थेचे नाव | मुदत |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) उड्डानपूल मार्गावरील वाहतूक बेट | मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन भाईंदर | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| २ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर दिपक हॉस्पिटल समोरील वाहतूक बेट | मे. निलकमल भूरचना डेव्हलपर्स प्रा. लि. | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ३ | मिरारोड (पू.) कृणाल शॉपिंग सेंटर समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ४ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर एस. के. स्टोन जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | भाईंदर (प.) उड्डानपूल उतरल्यावर असलेला वाहतूक बेट ३ वर्ष कालावधी करिता करारनामा नूतनीकरण करण्यात आले | पाली बिच रिसोर्ट, भाईंदर (प.) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ६ | मिरारोड (पू.) मिरारोड स्टेशन रोडवर सिंगापूर प्लाझा समोरील जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ७ | मिरारोड (पू.) मिरारोड विभागातील कार्यालया समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ८ | मिरारोड (पू.) शितल नगर जंक्शन समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ९ | मिरारोड (पू.) हैदरी चौक जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| १० | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (कनकिया पोलीस स्टेशन) सर्कल येथील वाहतूक बेट | मे. रश्मी हाऊसिंग बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| १० | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर शिवार गार्डन जंक्शन येथील वाहतूक बेट ३ | मे. ओस्वाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ११ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर उड्डानपूल जंक्शन वर येथील वाहतूक बेट | मे. सोनम बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स भाईंदर (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |

उपरोक्त नमूद वाहतूक बेट देखभाल व दुरूस्तीच्या कंत्राटाची मुदत संपलेली असुन सदर करारनाम्यांचे नुतनीकरण करण्यात येऊ नये. तसेच उपरोक्त नमूद वाहतूक बेट व शहरातील स्वखर्चाने बांधून देखभाल व दुरूस्तीसाठी दिलेले इतर वाहतूक बेट यांची करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर सर्व वाहतूक बेट नूतनीकरण, देखभाल व दुरूस्तीसाठी नव्याने इच्छूक संस्थांना देण्यासाठी योग्य अटीशर्ती ठेऊन जाहीर सुचना प्रसिध्द करावी. एका संस्थेस एकच वाहतुक बेट बांधण्यास अथवा देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात यावे. याबाबत कार्यवाहीचे अधिकार ही सभा मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रदान करीत आहे.

प्रशांत केळुसकर :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

मा. महापौर मॅडम वाहतूक बेटाचा विषय सभागृहासमोर आलेला आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होणारच २-४ दिवसाआधी एक विषय आपल्या शहरामध्ये घडला आहे. भारतरत्न इंदिरा गांधी उड्डाणपूलाच्यामध्ये जो टापू त्याच्यामध्ये एक नविन फलक लावण्यात आलेला आहे. सुर्योदवजी सुरजी महाराज.........

मा. महापौर :-

जुबेरजी मुझे लगता है आप विषयसे हटके बोल रहे है।

जुबेर इनामदार :-

मॅडम त्या विषयावर बोलणे गरजेचे आहे कारण त्या उड्डाणपूलाचे नाव आधी ठेवण्यात आलेले आहे. स्व. भारतरत्न इंदिरा गांधीच्या नावाने ते उड्डाणपूल आहे. त्याच्यावर एक नविन फलक लावण्यात आलेला आहे. संयम सेतू सेतूचा अर्थ उड्डाणपूलच झाला, ब्रिजच झाला. एका वास्तूला दोन नाव कशी देऊ शकतात.

मा. महापौर :-

मैं आपको बताती हूँ उसके पहले जो शिला लगी थी उसमें सेतू ही था ऑब्जेक्शन किसीने नही किया अब हमारे पास जो आया है वो नविनीकरण, सुशोभिकरण का है। कारीगारोने जैसा पहले नाम था वैसा सेम नाम लिखा है। और हमने उस संस्था को जैसे ही चीज ध्यान में आयी है तो उस संस्था को पत्र लिखके बोल दिया है की वहाँ से सेतू शब्द हटा दिया जाए। बहुत जल्दी वो सेतू शब्द हट जाएगा।

प्रकरण क्र. ३३ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाहतुक बेट देखभाल व दुरुस्ती कामाबाबत.

ठराव क्र. ३२ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी विकासामार्फत खालील ठिकाणी वाहतूक बेट बांधण्यात आलेली असुन त्याची देखभाल व दुरूस्ती खालील संस्थामार्फत करण्यात येत आहे.

| अ. क्र. | ठिकाण | संस्थेचे नाव | मुदत |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (प.) उड्डानपूल मार्गावरील वाहतूक बेट | मे. श्रीजी कन्स्ट्रक्शन भाईंदर | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| २ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर दिपक हॉस्पिटल समोरील वाहतूक बेट | मे. निलकमल भूरचना डेव्हलपर्स प्रा. लि. | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ३ | मिरारोड (पू.) कृणाल शॉपिंग सेंटर समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ४ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर एस. के. स्टोन जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ५ | भाईंदर (प.) उड्डानपूल उतरल्यावर असलेला वाहतूक बेट ३ वर्ष कालावधी करिता करारनामा नूतनीकरण करण्यात आले | पाली बिच रिसोर्ट, भाईंदर (प.) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ६ | मिरारोड (पू.) मिरारोड स्टेशन रोडवर सिंगापूर प्लाझा समोरील जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि.१६/०५/२०१३ ते दि.१५/०५/२०१६ |
| ७ | मिरारोड (पू.) मिरारोड विभागातील कार्यालया समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ८ | मिरारोड (पू.) शितल नगर जंक्शन समोर येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ९ | मिरारोड (पू.) हैदरी चौक जंक्शन येथील वाहतूक बेट | मे. अस्मिता इस्टेट प्रॉपर्टीज प्रा. लि. मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| १० | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (कनकिया पोलीस स्टेशन) सर्कल येथील वाहतूक बेट | मे. रश्मी हाऊसिंग बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| १० | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर शिवार गार्डन जंक्शन येथील वाहतूक बेट ३ | मे. ओस्वाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स मिरारोड (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |
| ११ | मिरारोड (पू.) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर उड्डानपूल जंक्शन वर येथील वाहतूक बेट | मे. सोनम बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स भाईंदर (पूर्व) | दि. १६/०५/२०१३ ते १५/०५/२०१६ |

उपरोक्त नमूद वाहतूक बेट देखभाल व दुरूस्तीच्या कंत्राटाची मुदत संपलेली असुन सदर करारनाम्यांचे नुतनीकरण करण्यात येऊ नये. तसेच उपरोक्त नमूद वाहतूक बेट व शहरातील स्वखर्चाने बांधून देखभाल व दुरूस्तीसाठी दिलेले इतर वाहतूक बेट यांची करारनाम्याची मुदत संपल्यानंतर सदर सर्व वाहतूक बेट नूतनीकरण, देखभाल व दुरूस्तीसाठी नव्याने इच्छूक संस्थांना देण्यासाठी योग्य अटीशर्ती ठेऊन जाहीर सुचना प्रसिध्द करावी. एका संस्थेस एकच वाहतुक बेट बांधण्यास अथवा देखभाल दुरुस्तीसाठी देण्यात यावे. याबाबत कार्यवाहीचे अधिकार ही सभा मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना प्रदान करीत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदक :- श्री. प्रशांत केळूसकर

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३४, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये श्री. जुबेर इनामदार, प्रभाग क्र. ३३(ब) यांचे नगरसेवक पदाच्या अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठी निर्णय घेणेबाबत.

प्रशांत केळुसकर :-

मा. आयुक्त यांनी दिलेल्या गोषवाऱ्यानुसार श्री. जुबेर इनामदार यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांवर कोणत्याही प्रकारचे निर्णय देण्यात आलेला नसुन दोष सिध्द होत नाही त्यामुळे सदर विषय नामंजुर करण्यात येत आहे.

अश्विन कासोदरिया :-

माझे अनुमोदन आहे.

मा. सभापती :-

ठराव सर्वानुमते मंजूर.

प्रकरण क्र. ३४ :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये श्री. जुबेर इनामदार, प्रभाग क्र. ३३(ब) यांचे नगरसेवक पदाच्या अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठी निर्णय घेणेबाबत.

ठराव क्र. ३३ :-

मा. आयुक्त यांनी दिलेल्या गोषवाऱ्यानुसार श्री. जुबेर इनामदार यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांवर कोणत्याही प्रकारचे निर्णय देण्यात आलेला नसुन दोष सिध्द होत नाही त्यामुळे सदर विषय नामंजुर करण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत केळूसकर अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३५, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजनेतील रस्ते, रुंदीकरण, नविन रस्ते आरक्षणामध्ये बाधित होणाऱ्या बाधितांना मोबदला देणेबाबत.

नरेंद्र मेहता :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना राज्य शासनाने १९९७ मध्ये मंजुर केलेली असून सदर विकास योजनेची अंमलबजावणी २० वर्षात करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व नागरीकरण पाहता सद्यस्थितीत शहरातील रस्ते विकास योजनेतील रुंदीप्रमाणे तयार करुन वाहतुक रहदारीस वापरण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यानुसार शहरातील रस्ते रुंदीकरणाची मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. शहरात रुंदीकरणासाठी हाती घेतलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे तसेच धोकादायक इमारती आहेत. रस्ता रुंदीकरण, नव्याने रस्ते तयार करणे, आरक्षणे विकसित करण्यासाठी सदर रस्ते व आरक्षणावरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे हटविताना संबंधिताना योग्य मोबदला देण्याची आवश्यकता आहे. विकास योजनेतील रस्ता रुंदीकरण तसेच नविन रस्ते, आरक्षणाने बाधित क्षेत्रासाठी मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे लगतच्या उर्वरीत जागेमध्ये अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक किंवा जागेच्या मालकी हक्काबाबतच्या अद्यावत कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद मंजुर आहे. तसेच ज्या संबंधिताच्या सदनिका, दुकाने, गाळे पूर्णतः बाधित होत असतील अशा संबंधिताना नियमानुसार पात्रता ठरवून महानगरपालिकेकडे उपलब्ध होणाया जागेत यशावकाय व प्राधान्य क्रमानुसार सदनिका, दुकाने देता येतील. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरणात तसेच आरक्षणात बाधितांची तपासणी करुन यादी तयार करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

प्रशासनाच्या वरील प्रस्ताव पाहता सदर प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) विकास योजनेतील रस्ता रुंदीकरण, आरक्षण यामध्ये संपुर्णतः बाधित झालेल्या ०१/०१/२००० पुर्वीच्या सदनिका, दुकाने, गाळे धारकांना विकास हक्क प्रमाणपत्र देऊन जागा हस्तातंर करुन घेण्यात यावी अथवा सदर जागेचे हक्क महानगरपालिकेकडे हस्तातंर करुन घेऊन त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी. सदर जागेचा एफ.एस.आय./टी.डी.आर. त्या व्यक्तीस किंवा अन्य व्यक्तीस महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय देण्यात येऊ नये.

किंवा

२) ज्या बाधितांची जागा शिल्लक आहे. त्यांना उर्वरित जागेमध्ये अतिरिक्त चटई क्षेत्र देऊन बांधकाम परवानगी देण्यात यावी.

किंवा

३) महानगरपालिकेकडे बाधितांना देण्यासाठी बांधकाम क्षेत्र उपलब्ध झाल्यास त्यांना २६९ चौ.फुट क्षेत्राच्या (कारपेट) सदनिका कायमस्वरूपी देण्यात याव्यात तो पर्यंत पूर्णतः बाधितांना रु.५०००/- प्रति महीना भाडे देण्यात यावे.

किंवा

४) ज्या गाळेधारकांची (दुकानदाराची) जागा २०० चौ.फुट किंवा त्यापेक्षा जास्त गेलेली आहे अथवा जाणार आहे, त्यांना जास्तीत जास्त २०० चौ. फुट क्षेत्राचे बांधकाम क्षेत्र देण्यात यावे व २०० चौ. फुट क्षेत्रापेक्षा कमी जागा बाधित होणाया गाळेधारक/ दुकानदारांना त्यांचे जेवढे क्षेत्र बाधित होत आहे, त्या क्षेत्रा ऐवढे बांधकाम क्षेत्र कायमस्वरूपी देण्यात यावे. त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध असल्यास संबधितास जास्त बांधकाम क्षेत्र विकत घ्यावयाचे असल्यास चालू बाजार भावानूसार (Ready Recknor)दर आकारून जागा कायमस्वरूपी देण्यात येईल, तो पर्यंत पूर्णतः गाळा/ दुकान बाधितांना २०० चौ.फुट क्षेत्रासाठी रु.१०,०००/- प्रति महिना व त्यापेक्षा कमी क्षेत्र बाधित होत असल्यास त्याप्रमाणात भाडे देण्यात यावे.

५) रस्ता रुंदीकरण, नविन रस्ते व आरक्षणात कारखान्यांची जागा बाधित होत असल्यास बाधितांना त्यांच्याकडील बाधित होत असलेल्या क्षेत्रा ऐवढे बांधकाम क्षेत्र व ५०० चौ.फुट क्षेत्रापेक्षा जास्त जागा बाधितांना जास्तीत जास्त ५०० चौ.फुट बांधकाम क्षेत्र उपलब्ध असल्यास संबधिताना सदर बांधकाम क्षेत्र विकत घ्यावयाचे असल्यास चालू बाजार भावानूसार (Ready Recknor)दर आकारून जागा कायमस्वरूपी देण्यात येईल, तो पर्यंत पूर्णतः कारखान्याची जागा बाधितांना ५०० चौ.फुट क्षेत्रासाठी रु.१०,०००/- प्रति महिना व त्यापेक्षा कमी क्षेत्र बाधित होत असल्यास त्याप्रमाणात भाडे देण्यात यावे.

६) सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे पर्यायी जागा देण्यासाठी व्यवस्था नसल्याने बाधित झालेल्या सदनिका, दुकाने, गाळे धारकांकडील कागदपत्रांची छाननी व तपासणी करून पात्रता यादी तयार करण्यात यावी व संबधिताना प्राधान्य क्रमानूसार त्यांचे वाटप करण्यात यावे.

७) महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरण व आरक्षण पूर्णतः बाधित झालेल्या सदनिका, गाळे, दुकाने यांना कायमस्वरूपी पर्यायी जागा देण्यात येणार नाही तो पर्यंत त्यांना भाडे देण्यात यावे.

८) बाधित सदनिका धारकांना रु. ५०००/- प्रति महीना व दुकानधारक तसेच फॅक्टरी धारकांना रु.१०,०००/- प्रति महीना भाडे देण्यात यावे.

९) वरील प्रमाणे सर्व बाधितांना पर्यायी जागा हस्तांतर करताना कायदेशिर बाबी पार पाडण्यासाठी सदर जागेची किंमत रु.१००/- ठरविण्यात येत आहे.

१०) ज्या बांधकामाच्या प्रकरणात मा. न्यायालयाने कारवाईचे आदेश दिले असतील अथवा मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारवाई केली असेल किंवा न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून तोडण्याची कारवाई केली असेल अशा बांधकामाचे पूर्नःवसन करता येणार नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रस्ते रुंदीकरण, रस्त्यामधील बांधकाम, आरक्षणातील बांधकाम यामध्ये बाधितांना वरील प्रमाणे मोबदला देण्याच्या धोरणास व पर्यायी जागा वाटपास ही सभा मंजूरी देत असून धोरणाची अंमलबजावणी करण्याचे तथा धोरणात शिथिलता आणून योग्य निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देऊन प्राधिकृत करीत आहे. पर्यायी जागा उपलब्ध करून देईपर्यंत द्यावयाच्या भाड्याची रक्कम संबधित बाधितांना अदा करण्यासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विकास आराखडा अंमलबजावणी या लेखाशिर्षातील विकास आराखड्यात जागा संपादन करणे या उपशिर्षात विकास आराखडा जागा संपादन करणे/मोबदला देणे अशी दुरुस्ती करण्यास व सदर उपशिर्षात सुधारीत विकास आराखडा तयार करणे या उपशिर्षातील रु. १.०० कोटी पुर्वविनियोजनाद्वारे वर्ग करण्यास तसेच अंदाजपत्रकात अखर्चित राहणाया तरतुदीमधुन देखील पुर्नविनोजन करण्यास मा. आयुक्तांना अधिकार देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

नरेंद्र मेहता :-

मा. महापौर मॅडम, या शहरामध्ये रस्ते वायडिंगसाठी सर्व प्रथम आम्ही मा. आयुक्त, मा. महापौर, मा. उपमहापौर, सर्व पदाधिकारी, सर्व अधिकारी व कर्मचारी ह्यांचे मनःपूर्वक आम्ही अभिनंदन करतो की आपण चांगले निर्णय घेतला ह्या शहरात ट्राफीकची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. १९९७ साली आराखडा मंजूर झाला आणि त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे होते काही कारणाने ते रखडल होते. पण मा. आयुक्त आणि प्रशासनाने ती भूमिका घेतली म्हणून त्याचे अभिनंदन करतो. ह्या शहरात जे नागरिक राहतात ते ह्या शहराचे नागरिक आहेत आणि त्यांच्यावर अन्याय होऊ नये त्याची जबाबदारी आपली आणि ह्या लोकप्रतिनिधीची आहे. ह्या अनुषंगाने जी घरे रस्ता वायडिंगमध्ये जी अधिकृत असतील अनधिकृत असतील रस्ता वायडींग २००० पूर्वीची असेल त्यांना २६९ फुटचे कार्पेट सुपर बिल्डअप म्हणजे ४५० च्या

आजूबाजूला त्यांना १०० रुपयाच्या ॲग्रीमेंटवर रजिस्ट्रेशन करुन देण्यात यावे असा आम्ही निर्णय घेतला आहे. बऱ्याच ठिकाणी आपल्याला ६ महिन्यांनी जागा उपलब्ध होणार, काही वर्षभरात उपलब्ध होणार तिथपर्यंत पाच हजार भाड ठरवले आहे ते भाडे देण्यात यावे. जी दुकाने २०० फुट पेक्षा जास्त असतील त्यांना जास्तीत जास्त २०० फुटची दुकान त्यांना देण्यात यावी. कारण ती इमारत पण जास्त आहे २०० फुट कार्पेटची इमारत असतील सुपर बिल्टअपमध्ये ती ३५० च्या वर गेली. २०० फुटपर्यंत त्यांना दुकान देण्यात यावी. १०० असेल त्यांना १००, १५० असेल त्यांना १५० जास्तीत जास्त २०० त्याला पर्याय व्यवस्था करुन द्यायचे हा निर्णय घेतला आहे. जिथपर्यंत आपण दुकान देत नाही त्याला १०००० प्रति महिना भाड द्यायचे आहे. त्यानंतर गाळे इंडस्ट्री ज्याचे १०० टक्के गाळे बाधीत झाले आहेत ते अधिकृत असतील अनधिकृत असतील २००० पूर्वीपासून अस्तित्वात असतील तर त्यांना जास्तीत जासत १०००० भाडे देण्यात यावे. ५०० फुटपेक्षा कमी असेल त्याला ५०० फुटपेक्षा कमी गाळे द्यायचे. एखाद्याचे २०० फुट गेल असेल त्याला २०० फुटच द्यायचे आहे. १०० फुट गेल असेल तर १०० फुट ८०० फुट गेल असेल तरी त्याला आपण ५०० फुट देतो. कारण शेवटी त्या सर्वांचे पुर्नःवसन करणे आपले कर्तव्य आहे. १०००० तोडल्यावर १०००० आपल्याला देता येणार नाही. लिगल असेल तर अनेक प्रोसेस आहे. इनलिगल असेल तर मर्यादा फिक्स करायला लागेल. एखाद्या व्यक्तीने अनधिकृत बांधकाम केले ते पाच हजार फुटाचे केले असेल पण शासनाचे धोरण आहे की त्याला बेघर करु नये. त्यासाठी त्याला आपण घर उपलब्ध करुन देतो. त्याने नियमात घेतले असते तर ही परिस्थिती आली नसती. पण त्यावेळी ज्या लोकांनी दिल ज्या लोकांनी घेतलं. त्याची सद्‌बुध्दी किंवा त्यांना माहित असेल त्या ॲंगलने घेतले त्याच्यावर कोणते आरोप न करता लोकांना बेघर होऊ नये म्हणून आपण हा निर्णय घेतो आहे आणि ज्याठिकाणी टी.डी.आर किंवा अशा बऱ्याचशा जागा आहेत त्याठिकाणी त्याचा मोबदला कोणी घ्यायला आला रस्त्याखालील बाधीत बऱ्याचशा ठिकाणी असा प्रश्न पडला आहे की दुकान माझ्या नावावर आहे पण जागा जागामालकाच्या नावावर आहे. जागामालक टी.डी.आर साठी उपस्थित राहील तरी आम्ही हा निर्णय दिला आहे. ज्या कोणाची दुकान गेली आहेत त्याची आपण संमती घेऊनच त्याला टी.डी.आर देऊ तो टी.डी.आरला उभा राहील आणि हा रस्त्यावरच राहील असे होता कामा नये किंवा भविष्यात त्याला जागा नको तर ज्यावेळी रि-डेव्हलपमेन्ट होईल त्याचा एफ.एस.आय. त्या बाजूच्या ॲडजर्निंग बिल्डींगमध्ये किंवा उरलेली जागा म्हणजे ज्यावेळी बिल्डींग बांधतील त्याला म्हणजे कुठलीही एक पर्यायी व्यवस्था त्याला देता येईल. पगडी सिस्टम असू द्या किंवा ओनरशिप असू द्या जिथपर्यंत त्या जागा मालकाची संमती नाही तिथपर्यंत त्याला बिल्डींग परवानगी किंवा मोबदला देऊ नये जिथपर्यंत त्याचा निर्णय होत नाही. आपण एखाद्याला दुकान किंवा घर दिले तर त्याची जी काही ओनरशिप आहे. एखादा व्यक्ती एका बिल्डींगमध्ये राहतो त्याला आपण बेघर केल म्हणून आपण घर देतो आणि भविष्यात त्या जागेवर बिल्डींग झाली किंवा त्याचा एफएसआय कोणी मागितला तर तो जो अधिकार असेल तर तो महानगरपालिकेला असेल ही जी ओनरशिप महानगरपालिकेने आपल्या नावावर करावी आणि नंतर ह्यांना घर द्यावे त्याचे जे काही कागदपत्र किंवा ॲग्रीमेन्ट असतील भाडे पावती असली महानगरपालिकेनी ते ताब्यात घ्यावे आणि त्याला पर्यायी व्यवस्था करावी हा आम्ही ठराव केलेला आहे आणि आम्हाला असे वाटते ह्या शहराला न्याय देण्याच्या भूमिकेने जे बेघर झाले आहेत त्यांना पुर्नःवसनचा आम्ही चांगला निर्णय घेतला आहे आणि रस्ता रुंदीकरण मोठ्या प्रमाणात सोयीचे झाले आहे. पुन्हा एकदा प्रशासनाला मा. महापौर, मा. उपमहापौर, सभागृहाचे आणि ह्या शहरातल्या नागरिकांचे विशेष अभिनंदन करतो. ज्यांनी एवढ्या मोठ्या कारवाईला, मेजर ९० टक्के सर्व त्याचे बाधीत झाले त्या लोकांनी सहकार्य केले. ज्यांची स्टे ऑर्डर होती त्यांनी समोरुन आपल्याला काढून दिले. त्याचे सभागृहाच्यावतीने शहराच्या विकासासाठी हातभार लावता त्यासाठी मनपूर्वक धन्यवाद देतो.

निलम ढवण :-

मा. महापौर मॅडम हा जो ठराव केला आहे तो अत्यंत चांगला आहे. कारण जे बाधित झाले आहेत त्यांना न्याय मिळाला आहे किंवा त्यांना एक दिलासा मिळाला आहे. परंतु ह्या बाबतीत ज्यावेळी इंडस्ट्रीमध्ये किंवा इतर गाळे तोडण्यात आले त्यानंतर एक सहानुभूती म्हणून परमिशन नाही आहे पण त्यांनी त्याच्यावर बऱ्याच प्रमाणात वाढ केलेली आहे ते गाळे वाढवले आहेत ते २५-३० फुट वाढवले आहेत. हेच गाळेधारक पून्हा सूखसोयी मागण्यासाठी किंवा ह्या सगळ्याचा फायदा घेण्यासाठी पुन्हा जर आले तर त्यावेळी जागेवर जाऊन पाहणी करुन नंतरच हे निर्णय घेण्यात यावे अशी मी आपणास विनंती करते.

प्रशांत दळवी :-

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो अत्यंत चांगला विषय मा. आमदारांनी वाचला आहे. त्याचे निकषही वाचून दाखवले आहेत. मा. महापौर मॅडम मी मा. आयुक्तांचे आणि प्रशासनाचे अभिनंदन करतोच परंतु आज आम्ही इकडे ठराव केला त्या अनुषंगाने ज्यांची घरे, दुकाने, गाळे बाधित होत असतील त्यांनी द्यावी. आता आपण चेक करणार आहोत की आपण कोणाला तात्पुरत्या स्वरुपात बांधायला दिले आहे किंवा काय आहे मा. महापौर मॅडम मी प्रत्येक वेळी ह्या विषयावर बोलत आलो आहे ज्यावेळी मिरारोड रेल्वे स्टेशन सुशोभिकरणाचा ठराव झाला. त्यावेळी आपली सुचना होती की त्याठिकाणी जे अतिक्रमण आहे ते हटवण्यात यावे. मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त महोदय त्याठिकाणी लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या नावाने लोक शिव्याची लाखोली वाहायला लागले आहेत. कारण ज्या ठिकाणी आपण रस्ता रुंदीकरणामध्ये ६ करोड खर्च करुन मिरारोड रेल्वे स्टेशन सुशोभिकरण करतो त्याच ठिकाणी मा. महापौर मॅडम काही गाळे

नव्हते काही दुकान नव्हती. त्यांना कोणत्या निकषावर त्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात आले माहित नाही. पण आज तिकडच्या रात्रीच्या वेळेला माहोल बघा जे पाच गाळे बांधले आहेत त्यांच्यापुढे भुर्जीपाव आणि चायनीजच्या गाड्या लागतात. त्याठिकाणी आपल्या आई बहिणी ये-जा करतात लाखो प्रवासी ये-जा करतात. त्याठिकाणी नशा केली जाते. त्या चायनीज आणि भुर्जीपावच्या गाडीवर आपण त्यांना गाळे तर तात्पुरत्या स्वरुपात दिलेच ते नंतर ठरवू तोडायचे नाही तोडायचे अधिकृत करायचे की नाही करायचे. परंतु त्याच्या बाहेरचे भुर्जीपाव, चायनीजच्या गाड्या उभ्या टाकलेल्या आहेत. मोठमोठे कंटेनर मी गेल्या महासभेत सांगितले ते अजून हटवले नाही त्या ठिकाणी लाखो रुपये खर्च करुन रस्ता बांधण्यात आला तो रस्ताही खोदण्यात आला त्याला पाण्याची लाईन तसेच लाईट देण्यात आली. तिकडे शांती शॉपिंग सेंटरची जी काही संस्था आहे त्या संस्थेच्या माध्यमातून पे ॲन्ड पार्क चालवणरा आजही त्याठिकाणी पे ॲन्ड पार्क चालवतो. त्या रस्त्यावर आपल्याला चालायला जागा ठेवली नाही. आपला दृष्टीकोन वेगळा करुन आपण हे करायला जातो. मॅडम ९६ सालच्या गटई कामगार सेनेनी पण त्यांना स्टॉल दिले आहेत त्याची आज स्टेशनलगत गरज आहे. त्यांना ९६ चे परवाने आहेत. जे गरजू आहेत त्यांना परवाने दिलेले आहेत त्यांची प्रथमतः व्यवस्था करण्यात यावी. ह्या रस्ता रुंदीकरणाला माझा विरोध नाही. पण जे अतिक्रमण आहे ते पूर्णतः हटवण्यात यावे. पे ॲन्ड पार्क हटवण्यात याव. ज्या गटई कामगारांना ९६ पासून स्टॉल देण्यात आलेले आहेत. त्यांनाही पुरेशी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी ही विनंती.

दिप्ती भट :-

आपण गेल्या महासभेमध्ये जो ठराव केला त्याच्यात आपण बोलले की आपण त्यांना घर देणार आहोत त्याचे जे ॲग्रीमेंट बनवणार आहेत ते आपण बनवणार की दुसर कोण बनवणार आहे कारण बाहेर चर्चेमध्ये असे आहे की आम्ही तुम्हाला ॲग्रीमेंट बनवून देऊ आणि तुमच्या हातात चावी देऊ. म्हणून माझे असे सांगणे आहे की त्यांना महापौर दालनात बोलवण्यात यावे त्यांनी ॲग्रीमेंट बनवून त्याच्या हातात चाव्या देण्यात याव्या मला उत्तर देण्यात यावे की त्यांना ॲग्रीमेंट कोण देणार आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम, भट मॅडमनी जो क्वेशन विचारला आहे त्याच्याबद्दल मी सांगू इच्छितो की, महानगरपालिकेच्या मालकीची घर ज्यावेळेस आपण देतो तेव्हा मा. आयुक्ताच्या सहीने आणि संबंधीत माणसाच्या ज्याच्या सोबत ॲग्रीमेंट करायचे आहे किंवा माझ्या स्वतःच्या किंवा मी प्राधिकृत उपायुक्त किंवा सिटी इंजिनिअर किंवा डेप्युटी इंजिनिअर त्यांच्या सहीने ह्या दोघांमध्ये ॲग्रीमेंट होतो ते ॲग्रीमेंट झाल्यानंतर एक छोटेखानी कार्यक्रम ठेवून त्यांना चावी देण्याचा कार्यक्रम करु. प्रशासनामार्फत ॲग्रीमेन्ट करण्यात येईल.

दिप्ती भट :-

मिरारोड स्टेशनचे जे नुतनीकरण होते ते कोण बनवते आपण बनवतो की कोणाला खाजगी दिले आहे.

मा. आयुक्त :-

मॅडम महानगरपालिका बनवणार आहे.

दिप्ती भट :-

मिरारोड स्टेशन जे बनवतो नूतनीकरण जे होते माझ्या खयालने आपण बनवतो पण बाहेर चर्चा अशी आहे की आणखी कोणी बनवतो. जागेवाले बोलतात की आम्ही बनवतो.

मा. आयुक्त :-

महानगरपालिकेनी टेंडर काढले आहे. महानगरपालिका त्याच्यावर स्वतः खर्च करते. बाकी कोणाचा काही संबंध नाही.

दिप्ती भट :-

मिरारोड स्टेशनला आपण जी परमिशन दिली आहे. मला खांबित साहेबांना विचारायचे आहे. बाहेर माहोल खराब करुन ठेवला आहे. त्याच्यामध्ये समोर येऊन बोलायची ताकद नाही. बाहेर स्वतःच्याच लोकांना बोलतात टॉयलेट बनवले आहे त्याचे कॉन्ट्रॅक्ट कोणी घेतले आहे. त्याचे उत्तर देण्यात यावे.

लियाकत शेख :-

मा. महापौर मॅडम विषयांतर होते.

दिप्ती भट :-

विषयाला लागूनच आहे.

(सभागृहात गोंधळ)

दिप्ती भट :-

खांबित साहेब उत्तर द्या ते कोण बनवते. महानगरपालिका बनवते की कोण बनवते.

दिपक खांबित :-

महानगरपालिका बनवते.

दिप्ती भट :-

कोणाला कॉन्ट्रॅक्ट दिले आहे.

दिपक खांबित :-

सर्व खाजगी संस्थेला.

दिप्ती भट :-

त्याच्यात ५० टक्के कॉन्ट्रॅक्ट घेतले आहे. मला तेच विचारायचे होते. त्याचे उत्तर द्या. कारण नगरसेवकांवर आरोप आला आहे. म्हणून मला विचारणे गरजेचे आहे. त्याच्यावर रितसर निर्णय द्यावा. ज्यांनी ठेका घेतला असेल ना खूप घेतले आहेत त्याचे..............

(सभागृहात गोंधळ)

लियाकत शेख :-

मा. महापौर मॅडम आमदार साहेबांनी एक चांगले डिस्क्रीप्शन दिले आहे धोरणात्मक निर्णयाबाबतीत विकास योजनेची अंमलबजावणी झाली पाहिजे. रस्ते रुंदीकरण झालेच पाहिजे. ही काळाची गरज आहे. शहराची गरज आहे. परंतु बेकायदेशीररित्या करण्याचा अधिकार कोणालाही नाही. प्रशासनाला नाही, मा. महापौर तुम्हाला नाही आम्हाला नाही. कोणाला कसलीही नोटिस न देता ज्याप्रकारे रस्ता रुंदीकरण मोहिम हाती घेण्यात आली होती. ह्या शहरात कोणती आणीबाणी लागली होती की इमरजन्सी करणे गरजेचे आहे. जागतिक बँकेचे कर्ज आले होते की शासनाचे अनुदान आले होते काही पैसे आपल्याला आताच्या आता रस्त्यासाठी खर्च करायला लागतील कायदा हातात घेऊन अशी काय आणीबाणी होते. कमिशनर साहेब प्लीस एक्सलेन. तुम्ही कोणत्या कायदया अंतर्गत कारवाई केली ते आम्हाला माहित असायला पाहिजे.

मा. आयुक्त :-

आपल्याला काय विषय मांडायचा आहे तो विषय संपूर्ण माडांवा आपले समाधान होईल असे उत्तर मिळेल.

लियाकत शेख :-

सध्या तर विषय समजलेला आहे की अनधिकृतरित्या बेकायदेशीररित्या महानगरपालिकेने गरिब लोकांवर कारवाई केलेली आहे हे खरे आहे की खोटे आहे.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम डी.पी. प्लाननुसार महानगरपालिकेच्या रस्ता रुंदीकरणाचा असो, आरक्षणाचे असो, अंमलबजावणी करणे हे महानगरपालिकेच्या आयुक्ताचे आद्य कर्तव्य आहे. आपले शहर झपाट्याने वाढत आहे हे आपल्याला सांगायची आवश्यकता नाही. ह्या शहरामध्ये १९८५ ला नगरपालिका होती त्याच्यापूर्वी ग्रामपंचायत होती त्यानंतर २००२ ला कार्पोरेशन झाले. आज आपल्या शहराची लोकसंख्या १० लाखाच्या घरात आहे. शहरात येणाऱ्या गाड्याची संख्या देखील वाढलेली आहे. आपण आजच्या तारखेत बघता मिरा भाईंदर शहराच्या बाहेर पडत असताना आपल्याला अनुभव आला असेल. कालच्या ४ दिवस सतत मुसळधार पाऊस ह्या शहरात चालू आहे. हे असताना आपल्याला कमीत कमी गोल्डन नेस्ट चौकापासून काशिमिराच्या पूलापर्यंत जायला अर्धा तासाचा वेळ लागला आहे. मी स्वतः २-३ ठिकाणी वृक्षारोपणाच्या कार्यक्रमासाठी बाहेर गेलो असता त्याचा अनुभव आला असे असताना आपण म्हणत असाल की एवढी काय एमरजन्सी लागली होती त्याच्याबद्दल मला काय बोलावे ते समजत नाही. अजून काय एमरजन्सी लागायला पाहिजे. सर्वात महत्वाचे म्हणजे दूरदृष्टीने विचार केला पाहिजे. रस्त्याचे रुंदीकरण आता केले नाही तर पुढील पाच वर्षामध्ये आपली गाडी एका जागेवरुन हलणार नाही हे माझे आपल्याला चॅलेन्ज आहे. त्याच्यानंतर आपण एक आरोप केला आहे की अनाधिकाराने गरिबांच्या घरावर कारवाई केली ही कारवाई मनपाने केली त्याचमध्ये अधिकृत घरे किती होती त्याचा तुम्ही मला रेकॉर्ड द्यावा. आपण जो आरोप केला आहे की ७५ टक्के जास्त लोक माझ्या माहितीनुसार ९० टक्के पेक्षा जास्त ह्याच्यावर कारवाई केली ते अनधिकृत महानगरपालिकेच्या रस्त्यावर उभे राहीलेले टेम्परररी शेड आहेत आणि १० टक्केमध्ये ज्या काही इमारती होत्या इमारतीला महानगरपालिकेने वेळोवेळी धोकादायकची नोटिस दिली होती. १-२ इमारतीमध्ये असे झाले आहे की १० फुट तोडायचे होते परंतु ते जुने असल्यामळे १० फुट तोडताना २० फुट खाली आले. हे मी मान्य करतो. २३१ आपण जरुर वाचावे त्याच्यामध्ये म्हटले आहे आयुक्तास ह्या अधिनियमाचे उल्लंघन करुन उभारलेली ह्या अधिनियमाचे उल्लंघन करुन म्हणजे कोणीही परवानगी घेतलेली नाही अशा प्रकारचे जे बांधकाम असेल जे बांधकाम आयुक्तांच्या पूर्वपरवानगी वाचून ह्या शहरात उभे केलेले असेल तर त्याला नोटिस देण्याची आवश्यकता नाही. ठेवलेली फेरी विकणारी येणारी किंवा विक्रीसाठी मांडलेली कोणतीही वस्तू नोटिस न देता काढून टाकता येईल. अ मध्ये म्हटले आहे नियत दिवसानंतर ह्या अधिनियमाच्या तरतूदीविरुध्द कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्यावर कोणत्याही उघड्या पाटावर, नालीवर, विहीरीवर किंवा टाकीवर उभारण्यात किंवा उभी करण्यात येईल अशी कोणतीही भिंत कुंपण, गठडा, खांब, पायरी, मंडप किंवा अन्य बांधकाम मग ते पक्के बसविलेले असो किंवा हलविण्याजोगे असो आणि कायम स्वरुपाचे असो किंवा तात्पुरत्या स्वरुपाचे असो किंवा कोणतीही खेळणी अशा परिस्थितीमध्ये जर आयुक्तांना वाटले की हे अनधिकृत बांधकाम आहे रहदारीला अडथळा करत आहे तर ते मला नोटिस न देता काढण्याचा अधिकार आहे.

लियाकत शेख :-

२३१ चा चांगला उहापोह करुन दाखवला २३१ मध्ये फेरिवाले जे बसलेले असतात टेम्परररी स्ट्रक्चर सहीत त्यांच्यासाठी मूभा आहे.

मा. आयुक्त :-

मी तुम्हाला क्लियर वाचून दाखवले आहे ते पक्के बांधकाम असो किंवा कच्चे बांधकाम असो शेवटचा वाचा.

लियाकत शेख :-

गेल्या २८ जूनला ठाणे कोर्टात सिनियर डिव्हीजनमध्ये टी.एम.सी.ने अशी कारवाई केली असता रस्ता रुंदीकरणासाठी विदाऊट नोटिस देऊन न्यायालयाने काय दिले आहे. बेकायदेशीर बांधकाम पाडताना, पालिका कायदेशीर प्रक्रियाचा अवलंब करत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर अशा अधिकारांना तुरुंगात टाकायला हवे अशा शब्दात न्यायमुर्तीनी आपला संताप व्यक्त केला. पेपरच्या कटींगसकट तुम्हाला देणार. न्यायालयाने काय ताशोरे ओढले. त्याबद्दल मी बोलतो. म्हणजे एकंदरीत ड्यू प्रेसेस ऑफ लॉ करणे गरजेचे असतानासुध्दा तुम्ही करत नाही. म्हणून न्यायालय नाराज होतात. अशा प्रतिक्रिया देतात.

मा. आयुक्त :-

बघा एक सिम्पल क्वेशन आपल्याला विचारतो महानगरपालिकेच्या या कायद्यामध्ये अस म्हटलं आहे की एक पायरी जरी तुमच्या घराला बसवायची असेल तरी परवानगी घेणे गरजेचे आहे. तुम्ही ती पायरी महानगरपालिकेची परवानगी न घेता तुम्हाला अनज्ञ आहे ते बांधकाम करण आणि मला मात्र ते करायच असलं की नोटिस दिली पाहिजे. आमकं केल पाहिजे तुम्हाला या कायद्याप्रमाणे बांधकाम परमिशन घेणं बंधनकारक आहे ते तुम्हाला मान्य नाही आणि मला तुमचं काढायचं असेल तर तुम्ही म्हणणार तुम्ही कायद्याप्रमाणे नोटिस दिली का? याच्यामध्ये सगळ म्हटलय भिंत, पायरी ते सगळ्या गोष्टी त्यात नमूद आहे.

भगवती शर्मा :-

साहब आपने २३१ का इंटरप्रिटेशन देखा नही है। इसके अंदर में कोर्ट का निर्णय हुआ है। नियम में लिखा हुआ है डेफिनेटली आप जो बोल रहे हो वो लिखा हुआ है। उसके बाद जो समय समय पे मैं आपको बता देता हूँ एक गुजरात कोर्ट का डिसीजन है १९८६ का सुप्रिम कोर्ट का डिसीजन है। फिर इन कोर्ट के अंदर में बी.एम.सी. ने ९/१० का १९८५ का भी डिसीजन है उसका लास्ट १ सेन्टेन्स में सुनाता हूँ आपको वन्स द एन्क्रोचरर्स आर वेल सेटल फॉर द लाँग टाईम नॉरमली २ विक्स ऑर १० डेज नोटिस प्रोसीडींग ऑफ द ॲक्शन टू मिट द फेअरनेस ऑफ द प्रोसीजर. ऐसे कई उसके अंदर में निर्णय है साहब आप २३१ का वाचन कर रहे है ठिक है लेकिन कई न्यायालयों के अंदर में अलग-अलग स्टेट में महाराष्ट्र में है, गुजरात में है इवन सुप्रिम कोर्ट में भी निर्णय दिया है की ऐसे एन्क्रोचमेंट के लिए उनको संधी मिलनी चाहिए। सुनवाई के लिए ड्यू प्रोसेस ऑफ लॉ होना चाहिए हमारा वो कहना है। हम इसके लिए कही भी नही कह रहे है की, उसके अंदर में आपने क्यों तोडे क्यों नही लेकिन ड्यू प्रोसेस ऑफ लॉ जिसके लिए संधी न्यायालय ने दी है। अलग-अलग केस के अंदर में आप इनका वाचन कर लिजीए।

मा. आयुक्त :-

आजच्या परिस्थितीमध्ये की समजा २० फुटाचे एखाद्या माणसाचे दुकान आहे आणि माझ्या याच्यामध्ये १० फुट जातो १० फुट शिल्लक राहतो. आजच्या तारखेला आपण १० फुटमध्ये तुझं काम चालु दे किंवा आपण त्याला सांगितलं की तुला कमी पडत असेल तर तु म्हणजे तुझी जागा असेल तर तुला एफएसआय भेटेल वगैरे बांधकाम परमिशन घेतल्याने आता सगळ्यात महत्वाचा मुद्दा आहे की १० फुट जागा आणि जर समजा आम्हाला १०० टक्के बांधकाम तोडायचं असेल तर ते बांधकाम मला अगोदर घोषित करावे लागेल हे अनधिकृत आहे म्हणून आणि अनधिकृत बांधकाम घोषित केल्यानंतर ते बांधकाम मला १०० टक्के पाडावे लागेल. त्यावेळेस मी अर्ध तोडू शकत नाही. ही आमची अडचण मुख्य असल्यामुळे शहरातील नागरिकांना व्यापाऱ्यांना त्रास होऊ नये या दृष्टीने आपण जर समजा एखाद्याच ३० फुट आहे, १० फुट आम्हाला लागतय फक्त २० फुटचा तुमचा बिझनेस करा. असं बऱ्याच व्यापाऱ्यांनी पुढ होऊन स्वतः काढून आम्हाला दिलं त्यांनी म्हणजे एवढ सहकार्य केलं की एवढ सहकार्य कुठल्याही व्यापाऱ्यांनी केलं नाही. आजपर्यंत तेवढं सहकार्य या शहरातल्या व्यापाऱ्यांनी पुढे होऊन सहकार्य केले आहे आणि त्यांनी आपल्याला संधी मागितल्यानंतर मी स्वतः साईटवर जाऊन बऱ्याच लोकांना मी संधी दिलेली आहे की साहेब २ दिवसांनी आमचं इकडे शिफ्ट होणार आहे. आम्ही २ दिवसांमध्ये काढून देतो. म्हणून एवढ्या सामंजस्याच्या भावनेने आपण केले आहे आणि काळाची गरज आहे या शहारामधले रस्ते रुंद होणे काळाची गरज आहे. आणि ड्यू प्रोसेस लॉ मी आपल्याला परत एकदा सांगतो जी इमारत अधिकृत आहे त्याला ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करणे गरजेचे आहे. जी इमारत अनधिकृतपणे उभी केलेली आहे त्याला कशाबद्दल ड्यू प्रोसेस ऑफ लॉ आणि अशी इमारत आम्ही तोडलीच नाही. आम्ही आमच्या रस्त्यावर अडथळा करणारे जे अनधिकृतपणे उभे राहिलेले स्ट्रक्चर आहे ते तोडलेले आहे. ज्या इमारती धोकादायक होत्या त्याला अनेक वेळा महानगरपालिकेने मागे नोटिस दिल्या आहेत अशा २-३ इमारत तुटलेल्या आहेत. ९९ टक्के आम्ही हे बांधकाम जे तोडलं आहे रहदारीमध्ये अडथळा करणारे जे स्ट्रक्चर आहे ते हेच बांधकाम आहे त्याच्यामध्ये..................

लियाकत शेख :-

आता चांगला प्रस्ताव यांनी दिलेला आहे नो डाऊट. पुर्नवसन लोकांच करणे आहे. पुर्नवसन करुन द्यायचे आहे, मान्य आहे परंतु सर हे फक्त कागदावर दिसेल तुम्हाला. प्रॅक्टीकली दिसणार नाही. तुम्ही विचाराल का, मी तुम्हाला एक उदाहरण देतो. बघा २००४ साली आपण एक ॲग्रीमेंट केलेले आहे. जेव्हा

काशिमिरा रस्ता रुंदीकरण झालें होते त्यावेळेला तुम्ही ६ लोकांना ॲग्रीमेंट तयार करुन देता. आम्ही पर्यायी जागा देतो, पर्यायी हे करतो नेहमी त्यांना २००४ पासून साहेब २०१६ आज ही ती माणसे रस्त्यावरच आहेत. त्यांना काही न्याय मिळाला नाही. त्यांना आजही म्हणजे थातुरमातूर आपण कागदावर आणणार का प्रॅक्टीकल देणार. त्या गरिबांना आणि उपासमारीची पाळी आहे त्यांची दुकाने गेली ती धंद्याची जागा होती त्यांची.

जुबेर इनामदार :-

प्रशासन बदलत नाही ना कितीही केल तरी आणि प्रशासन कायद्याच्या चौकटीच्या बाहेर जाऊन कुठलीही कारवाई करु शकत नाही.

रोहिदास पाटील :-

मा. महापौर मॅडम, या प्रस्तावाच्या तीन सुचना आहेत. त्या समजून घ्या. १. प्रशासनाने जी कारवाई केली. शहरातल्या सर्वच लोकांनी त्यांच स्वागत केले. त्यांचा काही विरोध करण्याचे कारण नाही. रस्ता रुंदीकरण पाहिजे हे खर आहे. त्यातील तीन टप्पे आहेत. रस्ता रुंदीकरण करते वेळी त्याला म्हणतो आपण ॲक्वीझीशन किंवा कारवाई करतो त्याच कोणालाही आयुक्तांनी विश्वासात घेतल नाही हा एक भाग. त्याच्यामुळे आपण सांगत गेलो की १२ मीटर रस्ता आहे, ४० फुट आहे, मार्किंग केले ४२, तोडले ४५-४७. लोकांमध्ये आक्रोश झाला. तुम्ही सफल झाले मीही सफल झालो. किती झालो हे तुम्हाला ही माहित आहे. मला ही माहित आहे आताच्या सुचना अशा आहेत जे थांबलेल काम आहे ४ गोष्टी नक्की लक्षात घ्यायला पाहिजे प्रशासनाने. आयुक्त साहेब पहिली जी आमची मागणी आहे ती नीट लिहून घ्या की याच्यासाठी स्पष्ट असा एक अधिकारी नियुक्त करा की ज्यांच्याकडून हे कामकाज पूर्ण होईल. जे बाधित आहेत आम्हाला तुम्हाला पत्र दिलेल की ५ नंबर प्रभागामध्ये एवढी मोठी कारवाई झाली. किती लोकांचे काय-काय नुकसान झाले आपल्याकडे काय नोंद आहे. आपण त्याच उत्तर देऊ शकत नाही. टपरीवाला गेला, दुकानवाला गेला, गाळेवाले गेला, घरे गेली यातील कुणाचीही आपल्याकडे नोंद नाही. जे करायचे आहे त्याची नोंद व्हायला पाहिजे साहेब. जसे केबीन रोड आहे. आम्ही तुम्हाला पत्र दिले की १८ मीटरचे ६० फीटवर जात आहे. त्याच्यामध्ये पुर्नविकास करतेवेळी त्या लोकांना ही संधी मिळतच नाही. इथे बसतच नाही. उदा म्हणून ती वसुंधरा बिल्डींग तोडली, आपला नाला निघाला त्या नाल्यावरुन आता उरलेल्या जागेवर वसुंधरा बिल्डींग बसूच शकत नाही. त्या लोकांना आपण आपल्या कॅबीनमध्ये बसून दिलासा देणे गरजेचे आहे. आणि मी त्या प्रभागाचा नगरसेवक आहे, कल्पना नगरसेविका आहे लोकांना उत्तर द्यायला काहीतरी पाहिजे की नाही त्यासाठी कोण व्यवस्था, कोण अधिकारी उत्तर देणार आम्ही बारकुंड साहेबांकडे गेलो तर नगररचनामध्ये जा, नगररचनामध्ये गेलो तर जे अनधिकृत कारवाई करतात त्यांना विचारा लोकांचे असे नाही व्हायला पाहिजे. तुम्ही स्वतः आले होते साहेब आपल्या ऑफिसमध्ये आले आमच्या प्रभागाच्या ऑफिसमध्ये आले पाऊण तास बसले. पाऊण तासामध्ये जातेवेळी तुम्ही चहा पिऊन गेले, बोलून गेले काका मी इथे आलो याचे मला सार्थक वाटले. कारण तुम्हाला कोणी उलट नाही बोलले. २०० लोक तिथे होते पण त्यातील एकाही माणसाने तुम्हाला अरेतुरेचा शब्द वापरला नाही. ते बोलत होते तुम्ही ऐकत होते. तुम्ही बोलत होते ते ऐकत होते असा सामोपचाराने शहरामध्ये वातावरण होणे गरजेचे आहे. कारखानदाराने आपलं ऐकल ते ही आता कारखानदार काय बोलू शकतो नाही म्हणू शकतो आपली पहिले ते नक्की व्हायला पाहिजे की हा रस्ता जो वाढणार आहे. आक्रोश कुठे झाला साहेब बी.पी. रोड, नवघर रोड, स्टेशन रोड होता तोर्यंत नव्हता. जेव्हा इंडस्ट्री मध्ये घुसले तेव्हा लोकांमध्ये भिती झाली आणि साध उदा. देतो तुम्हाला भिती म्हणजे कशी तुम्ही पंचभगिनी बिल्डींगकडे गेलात नगरसेवक प्रेमनाथ पाटील नाहीत तिथे मी बाहेर होतो. त्यादिवशी ती लोक येऊन तुमच्या केबीनमध्ये भेटलीत. तुम्ही शाश्वती दिली. प्रेमनाथ पाटील चेअरमन सेक्रेटरी तुम्ही काही चिंता करु नका. संध्याकाळी आपले प्रभाग अधिकारी अविनाश जाधव तिथे गेले उद्या सकाळी खाली करा मी जे.सी.पी. घेऊन येतो अस २४ तासात काय बिल्डींग खाली होते का साहेब आज त्यांची परिस्थिती अशी झाली की त्यांना १,३०,००० रु. खर्च करुन साहेब त्यांची स्टे त्यांना घ्यावी लागली का स्टे घ्यावी लागली. अन्य लोकांनी नाही घेतली त्यांनी का घेतली कारण शाश्वतीच नव्हती कोणती काही. उद्या तुटेल म्हणून घेतली ना आणि आताही ते संमती देतील पण समजावून सांगा ज्या-ज्या ठिकाणी असेल समजावून सांगा आणि मी तुम्हाला एक विनंती केली तुम्हीही त्याला मान्य केलं होतं की ज्या ठिकाणी १८ मीटर रस्त्यामध्ये एफ.एस.आय. आपण देऊ शकणार नसाल तर आजची सभा आहे. सभामध्ये सगळेच लोक त्याच्यामध्ये सहानुभूतीने विचार करतील ज्या ठिकाणी आवश्यक आहे १८ च्या ऐवजी १५ मीटर रस्ता केला केबीन रोड आहे सर २००० लोक अशी गरगर फिरत आहेत ज्यांचा भाव एक लाख रु. होता तो आज ५० हजार रु. बिल्डींग तुटनेवाला है, गाला तुटनेवाला है, दुकान तुटनेवाला है, त्यांचे भाव आज कोण दुकान विकायला तयार आहे पण कोणी घ्यायला तयार नाही. घर सोडायला तयार आहेत तर घर घ्यायला तयार नाही आपण बिल्डींग काय कलिंगड सारखी कापणार का? आणि एक व्याख्या बदला तुमच्या कामकाजाची तुम्ही जे बोलता विकास आराखडा बाधित जी अनधिकृत बांधकाम झाली त्याच्यामध्ये तुम्ही वर्गीकरण करा की जो विकास आराखडा ९७ ला जाहिर झाला आम्ही पण तुम्हाला विनंती करतोय आम्ही वस्तुस्थिती ठेवतोय समोर की ७० सालापासून त्या फॅक्टरी होत्या ७० सालापासून घरे होती, ७० सालापासून चाळी होत्या. आम्ही विकास आराखड्यामध्ये बांधल तर ती चूक आहे पण विकास आराखडा जाहिर करतेवेळी डिक्लेर करतेवेळी जिथे घरं होती बिल्डींग होती, इंडस्ट्री होत्या त्याच्यावर विकास आराखडा दाखवला. याला दोष

कुणाचा साहेब. आमच्यासारखाच्या सामान्य माणसाचा. मी कारखानदार आहे साहेब आज सभागृहात मी उभा आहे मी सव्वा रु. रोजाने नोकरी करुन अकरावीची पुस्तके विकत घेऊन शिकलेला माणूस आहे मला ती जाणीव आहे. मला बापाने घर दिले नाही माझ्या सासऱ्याने पण नाही दिले दुसरं कुणाला काही दिल तर माहित नाही. आपल्या पैशाने बांधलेल घर जर समोरचा माणूस तोडतोय त्यावेळी काय वाटतय ते घर बांधणाऱ्याला वाटत असेल साहेब संध्याकाळपर्यंत ज्यांच दुकान चालु होतं त्याच कामकाज चालु होतं आपला माणूस गेला लाल फटका मारला उद्या सकाळी १२ वाजता ते दुकान गेलं हे चित्र नको ना. हे चित्र आपलं असं आहे की तुम्ही आताही ठरवा त्याच्यावर अधिकारी नेमा हे रस्ते डिक्लेर करा हे रस्ते आपल्याला वाढवायचे आहेत. हे रस्ते बाधित आहेत त्यांना अशा-अशा पध्दतीने आपण देऊ आणि त्यात काय फरक पडतो आहे साहेब ही काय कारवाई आपल्याच बापाने केली का? महानगरपालिका मुंबईने केली. ही कारवाई नवी मुंबईने केली. भिवंडीने केली, उल्हासनगरने केली, कल्याणने केली, ठाणा, वसई विरारमध्ये झाली. आपल्या महानगरपालिकेत पण झाली सगळ्याच ठिकाणी कारवाई चालु आहे. लोक त्याच स्वागत करतात पण ते करतेवेळी आपण ज्या लोकांना विश्वासात घ्यायचं ते घेतलं नाही. त्यामुळे आक्रोश झाला. माझी एक विनंती आहे की जो रस्ता बाधित होता आणि केबीन रोडसाठी तर मी पुन्हा-पुन्हा सांगतोय की तो तुम्ही १८ मीटर पकडाल तर तिथे काही बसणार नाही साहेब सगळ स्मशान होईल आणि जर तो १५ मीटर केला तर काही त्यातील बिल्डींग ना तुम्ही राहत देऊ शकाल. मी दिलेली सूचना ही भावनात्मक आहे कायद्यात कशी बसवायची ते या सभागृहाने आणि सभागृहाच्या वतीने खात्री देतो पक्ष कुठलाही तिथे येणार नाही. सभागृहाची या तुमच्या कामकाजात प्रशासनाच्या कामकाजांमध्ये सद्भावनाच राहील. कुठेही कोण विरोध करणार नाही साहेब. कदाचित माझ्या सांगण्यामध्ये घाई झाली असेल काही अपुरे झाले असेल पण आमच्या भावना तुम्ही लक्षात घ्या की, लोकांमध्ये आपण काय करायला पाहिजे कशा पध्दतीने आणि आयुक्त साहेब कोणीतरी अधिकारी नेमाच की त्यांनी त्याच विचार करावं सूचना, मागाव्या घ्याव्यात. लोकांना द्याव्यात काही अडचणी असतील तर त्या-त्या प्रभागात ते-ते नगरसेवक किंवा त्यांना ज्या व्यवस्था असतील त्यांनी येऊन महापौरांना भेटतील ना ते लोक. महापौर मॅडम तुम्ही ऐकलं पाहिजे मी तुम्हाला एक उदाहरण दिल होतं तो बुवा तुमचा नातेवाईक आहे तो लियाकत शेख यांचाही संबंधित आहे. माझ्याही संबंधित आहे ४० वर्षाच्या ओळखीचा आहे. त्याचे ६ गाळे तुटतात तर तो बायका पोरं घेऊन तो इथे घरात बसतो अशी परिस्थिती आहे. धन्यवाद.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम आज हा विषय महासभा घरात आणलेला आहे. विकास आराखड्याबद्दल. महापौर मॅडम आपण महापौर म्हणून या शहराच्या प्रथम नागरिक म्हणून त्या ठिकाणी बसलेल्या आहात. महापौर मॅडम हा विषय अगोदर घेऊन नंतर तोडू कारवाई झाली पाहिजे होती पण अस काय केलं माहित नाही या सभागृहाला आणि येथील नगरसेवकांना महापौर मॅडम सगळ्यांच्या अगोदर फटका बसला एम.आय. उद्योग नगर तिकडे आमचे गाळे आहेत. ५० गाळे ५० गाळ्यांना नोटिसा काढल्या. डी.पी. रोड महापौर मॅडम १२ मीटरचा आहे आमचे आदरणीय मिरा भाईंदर शहरातील ज्या जनतेने आमदार म्हणून निवडून दिले आमदार साहेब तिकडे यायचे १२ मीटर आहे. मी ९ मीटर दाखवून देईल मी १० मीटरचा करुन देईल. पण हा आपल्याला रोड बनवायचा आहे. चर्चा चालू होती महापौर मॅडम तिकडे आखणी झाल्या. महापौर मॅडम निस्वार्थपणे या शहराचं काम चालू झालं पाहिजे आणि या विकासासाठी कदाचित सत्ताधारी जेवढे इच्छुक आहेत. त्याच्यापेक्षा जास्त महापौर मॅडम आम्ही इच्छुक आहोत. विकास आराखड्यासाठी आम्ही जास्त आक्रमक आहोत. या शहराचा विकास आम्हालाही करायचा आहे. ज्या ठिकाणी माझे गाळे आहेत त्या ठिकाणी १२ मीटरपेक्षा जास्त रस्ता आहे. कोण कसं मेजरमेंट घेईल आडव घेईल, उभं घेईल, कुठून रोड जातो कुठली भिंत पकडायची आहे हे आपल्या हातामध्ये आहे. महापौर मॅडम यावेळेस माझे १ नाही २ गाळे रेफर केलेत काय तिकडे गार्डन बनवायचं होतं का? मला माहित नाही. महापौर मॅडम वारंवार मी कमीशनर साहेबांना भेटत होतो. सगळे एम.आय. उद्योग नगरवाले जॉब मिळत नव्हता. महापौर मॅडम मी शेवटी सगळे पत्रकार होते या कक्षात बसलेले. सगळ्या पत्रकारांना ती जागा दाखवली मेजरमेंट करुन घ्या. कमीशनर साहेब बघून घ्या ऐकून घ्या. महापौर मॅडम पहिले डी.पी. रोडसाठी आम्हाला नोटिस आली. महापौर मॅडम ज्या वेळेला हे तोडू कामकाज चालू होणार होतं मी आपल्याला एक निदर्शनास आणून देऊ इच्छितो महापौर मॅडम ज्या वेळेला आम्हाला माहिती पडलं की आम्हाला स्टे घ्यायला देखील अवधी देत नाही. महानगरपालिका रातोरात काही पत्रकार आणि सूत्रधारांनी आमदार प्रताप सरनाईक साहेबांशी कॉन्ट्रॅक्ट केलं. सकाळी ९ वाजेपासून तिथे बसले पालिका तोडू रस्ते पोलीस १०० जेसीबी हे सगळं फौजफाट आम्हाला वाटलं पाकिस्तानी युध्दाची लढाई चालु होणार आहे. अस वाटतं होत त्या ठिकाणी.

मा. महापौर :-

नलावडेजी मी आपल्याला विनंती करते आपण थोडक्यात मांडा बऱ्याच नगरसेवकांना बोलायचं आहे. आपण थोडक्यात मांडा.

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम नलावडे साहेबांनी जो विषय मांडलेला आहे. या सभागृहामध्ये प्रसिध्दी कहूँ तो माँ मरती, ना कहूँ तो बाप कुत्ता खाता। नलावडे साहेब तुम्हाला प्रश्नाचे उत्तर देतो. तुमचा प्रश्न आला माझ्या लक्षात. म्हणजे केलं तर का केलं नाही केलं तर का केलं नाही. आता मला सांगा तुम्ही एकीकडे म्हणतात

ड्यू प्रोसेस ऑफ लॉ. काका ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करा. एकीकडे सांगितलं जात आणि एम.आय. इंडस्ट्रीसाठी ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन किती दिवस झाले त्याच्यानंतर तरी ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो केल्यानंतर आपल्याला नोटिस इश्यू केल्यानंतर आपण आपलं बांधकाम काढून घेतलं आहे का? त्याच्यामुळे आम्हाला तोडावे लागत आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. आयुक्त :-

ड्यू प्रोसेस ऑफ लॉ फॉलो करुन ४ महिने झाले.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम तो गाळा सेव्हन डेटला घेतलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

दिनेशजी आपल्याला विनंती करते आपण बसून जा.

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम स्टे घ्यायला गेलो साडेतीन लाख स्टेला गेल आमची दिवाळी खराब केली त्याच्यानंतर तिसरी नोटिस दिली. कमिशनर साहेब आमचा स्टे आहे ना. आमच्या स्टे असताना तुम्ही नोटिस कुठल्या पध्दतीने देता किती जबरदस्ती करता. कायदा कानुन कुठे काही आहे का नाही शहरामध्ये. स्टे आहेत ना आमचे. तरीपण किती नोटिसा देता आणि आताची नोटिस आली १५ दिवसामध्ये तोडा. मग हा विषय अगोदर का नाही आणला. हा विषय अगोदर का नाही आणून घेतला तुम्ही. महापौर मॅडम तिथे डि.जे. इंडस्ट्रीज आहेत, एम.आय उद्योग नगरच्या नाक्यावरती डी.जे इंडस्ट्रीज आहेत.

(सभागृहात गोंधळ)

मा. महापौर :-

नलावडेजी आप बैठ जाइए मैंने आपको बहुत वक्त दिया है बोलने का।

दिनेश नलावडे :-

महापौर मॅडम अजून माझा विषय संपलेला नाही. महापौर मॅडम आज टी.डी.आर देणार. टी.डी.आर ची किंमत किती............

(सभागृहात गोंधळ)

दिनेश नलावडे :-

हा विषय चर्चेसाठी आलेला आहे. इथल्या लोकांना न्याय मिळाला पाहिजे. माझा गाळा खाली झाला. मला नोटिस दिल्यामुळे माझे नुकसान झाले.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

सन्मा. सभागृहाला मी विनंती करत आहे दोन मिनिट शांत रहावे. चर्चा महत्वाची आहे, गंभीर आहे. सभागृहामध्ये विशेष सभा आयोजित करण्यात आली आजच्या या विषयावर चर्चा करण्यासाठी शहरामध्ये विकासाच्या नावावर विनाश करता येत नाही. आणि विकासाच्या नावावर शहरवासियांचा विनाश केला गेला. आयुक्त महोदय कितीही कुठेही एम.आर.टी.पी. असो भूसंपादन कायदा असो किंवा महानगरपालिकेचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम असो कॉन्स्टीट्यूशनल राईट्स घटनेच्या पुढे काहीच चालत नाही. एका बाजूला आम्ही या शहरामध्ये पूर्णाकृती पुतळा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा बसवतो जे हे घटनेचे शिल्पकार आहेत. त्यांच्या घटनेची पायमल्ली करुन शहराचा विकास होऊ शकत नाही. घटना काय बोलते आर्टिकल ३०८ राईट टू प्रॉपर्टी, द राईट टू प्रॉपर्टी कॅन नॉट बी टेकन अवे विदाऊट द ड्यू प्रासेस ऑफ लॉ ॲज पर द प्रोव्हिजन ऑफ आर्टिकल ३०८ ऑफ द कॉन्स्टीट्यूशन ऑफ इंडिया आर्टिकल ३०० इन्सर्टेड बाय द कॉन्स्टीट्यूशन ४४ अमेन्डमेन्ट. अर्थात आयुक्त महोदय परत १० विषय संपवायचे आहेत. विकासाच्या रस्त्यामध्ये कोणीही लोकप्रतिनिधी कधीच येणार नाही या पूर्ण शहराला विकास पाहिजे. ९७ साली या विकासाच्या आम्ही दुरदृष्टीने तेव्हा या शहराचा विकास आराखडा तयार झाला हे रस्ते आज ८ मीटरचे आहे. १० मीटरचे आहेत ते १५ मीटरचे होणे गरजेचे आहे पण त्या काळामध्ये लोकसंख्या कमी होती आम्हालाही याची कल्पना आहे. त्या दुरदृष्टीमुळे त्यावेळी ९७ साली विकास आराखडा तयार करण्यांत आला. आणि त्या विकास आराखड्यामध्ये मोठे रस्ते कसे व्हावे किंवा त्याच आरक्षण ठेवण्यात आलं. आज त्या आरक्षणमध्ये त्यांना ९७ साली विकास आराखडा तयार केला असेल मात्र ज्या जागेवरती आरक्षण टाकण्यात आले आहे तिथे आयुक्त महोदय आधीपासून म्हणजे ग्रामपंचायत झाल्यापासून नगरपरिषद असताना जुने गाळे व्यवसाय दुकाने मकाने रहिवासी इमारती हे दिर्घकाळापासून तिथे अस्तित्वात आहेत. आपण २३१, २३२ वाचुन आम्हाला दाखवले मान्य आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २३१, २३२ तुम्हाला तो अधिकार देतो. कुठे देतो ते ही स्पष्ट करावे लागेल. जे रस्ते विकसित झालेले आहेत डी.पी. रस्ते विकसित होऊन पूर्ण झालेले आहे त्याच्यावरती केलेले अतिक्रमण हटवण्यासाठी तुम्हाला कुठलीही नोटिस द्यायची गरज नाही हे आम्हाला मान्य आहे. मात्र अशा प्रकारे एका अधिनियमाच्या दुरुपयोग कारण अधिनियमाच्या पाठ तुम्हालाही चांगल माहित आहे अर्धा ग्लास खाली किंवा अर्धा ग्लास भरलेला दोन्ही बाजूने अधिनियमाचा वापर केला जातो. त्याचा अर्थ काढला जातो मी वेगळा काढणार तुम्ही वेगळा काढणार

तुम्हाला क्रॉसींग दिली तर वेगळा करेल. अशाप्रकारे तो प्रकार असताना तुमची भुमिका साहेब तुम्ही मांडलेल काम हाती घेतलं विकास केल पाहिजे शहराचा रस्ते रुंद करायला पाहिजे ९७ साली विकास आराखडा तयार झाला. २०१७ मध्ये तो विकास आराखडा परत तयार करण्याची वेळ आली म्हणजे गेल्या १९-२० वर्षामध्ये ते रस्ते रुंद करण्याचे काम हाती घेण्यात आलेले त्याच दरम्यान यांनी १५/१०/२०१५ रोजी आम्ही इरादा जाहिर केला साहेब तुम्हीच गोषवारा दिला परत नविन आराखडा आपल्याला तयार करायचा आहे. सर्व संमतीने आपल्याला एक ठराव करुन दिला नाही. आपल्याला करावा लागेल आपल्याला करावेच लागेल ती एक बांधीलकी आहे. टाऊन प्लानर त्याच्यावरती निश्चित झाले. स्थायी समितीने ४८ लाखाची मंजूरी दिली. कशाला दिली सर्वेक्षण करण्यासाठी दिली हे सर्वेक्षणाची काम बाकी असताना २०२० मध्ये परत विकास आराखडा होणार आहे त्या आराखड्यामध्ये तीच आरक्षण परत ठेवता आली असती तुम्हाला ती आरक्षण त्यातून वगळायची आहेत असा कुठे काही नियम नाही. आरक्षण जशीच्या तशी तुम्हाला ठेवता आली असती आणि त्या आरक्षणासाठी लोकांचे अभिप्राय आले असते आपल्याकडे हरकती सुचना परत झाल्या असत्या लोकांच्या लक्षात आलं असत की आम्ही कुठेतरी आम्हाला आमची बाजू मांडावी लागेल ९७ साली लोकांनी ती मांडली नाही कारण तेव्हा अभ्यास नव्हता. साहेब परत आपण ती संधी लोकांना दिली नाही ते शहराचे नागरिक आहेत त्यांनी काय पाप केले नाहीत त्याकाळात त्यांना जिथे बांधायची संधी मूभा देण्यात आली तिथे त्यांनी आपला घर कुटुंब तिथे त्यांनी आपला संसार थाटला.

मा. महापौर :-

जुबेरजी आप शॉर्ट में......

जुबेर इनामदार :-

शॉर्ट में ही बोल रहा हूँ। मेरा विषय शॉर्ट में और मुद्दे पे खत्म होगा। हा या लोकांच्या या शहराच्या भवितव्याचा प्रश्न आहे. लोकांची घरे गेली, व्यवसाय गेला त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न आहे लोकांना घराच बेघर करण्यात आलं. मला सांगा त्या मुन्शी कम्पाऊंडमध्ये मुख्य रस्ते तुम्ही केले त्याच स्वागत केलं. मुन्शी कम्पाऊंडमध्ये ते मुन्शी कम्पाऊंड तिथच्या तिथे संपून जातो. कितीतरी कुटुंब तिथे तुम्ही त्यांची घरे उद्ध्वस्त करुन टाकली. साहेब त्याच पुनर्वसन करणे गरजेचे होते. भूसंपादनाची कारवाई पूर्ण करणे गरजेचे होते. एम.आर.टी.पी. अंतर्गत तुम्हाला त्यांना रितसर नोटिस त्यांना मोबदला किंवा टीडीआर हे देणे गरजेचे होते. साहेब डी.सी. रुल मध्ये स्पष्ट उल्लेख आहे. आता थोड्याच वेळापूर्वी सन्मा. सदस्य नरेंद्र मेहता साहेबांनी एक ठराव मांडला आहे. इथे ठराव चांगला होता पण तो नियमात बसतो का? त्यांनी मांडलेला ठराव आला नियमात बसण्यासाठी कारण हा नगररचनाचा भाग आहे जे काही आज यांनी ठराव मांडला कुणाला मोबदला द्यायचा, कुणाला त्याच भाड द्यायचं असेल हे आम्हाला जे काही करायचं ते करण्याआधी आम्हाला ३७ खाली अमेडमेन्ट लागतील. राज्यशासनाच्या मंजुरी लागतील इथे डी.सी. रुल मध्ये हौसींग फॉर डिसहाऊस यात एकमेव फक्त त्याच्यामध्ये प्रोव्हिजन आहे. त्याच्यामध्ये सुध्दा १८० स्क्वेअर फुटची आम्ही घरे देऊ शकतो. त्यांना कुणाला जे रस्त्याला बाधित आहे त्यांना. साहेब बाकीचं यांनी जो ठराव मांडला याच आम्ही स्वागत सुध्दा केलं तरी ते त्याला कायद्याची चौकट कुठे आहे. ती कायद्याची चौकट आधी बसवावी लागेल. ३७ खाली अमेडमेंट पाहिजे राज्यशासनाची मंजूरी पाहिजे किती तरी विषय राज्यशासनाकडे प्रलंबित आहेत. पुर्नविकास व्हावा या शहराचा, जुनी इमारती आहेत त्यांचा विकास व्हावा त्यासाठी आम्ही कितीतरी प्रस्ताव इथून पाठविले. राज्यशासन आम्हाला त्याची मंजूरी देत नाही कारण त्याला कारण आहेत. महत्वाची इन्फ्रास्ट्रक्चरचा मोठा प्रॉब्लेम आहे. त्याच्यामुळे त्याची मंजूरी ती लोक देत नाहीत. वाढीव एफ.एस.आय. आम्हाला प्राप्त होते. अशा परिस्थितीत ज्यांची आपण घरे घेतली त्यांना आपण कसा काय मोबदला देणार साहेब एका बाजूला तुम्ही पत्र सुध्दा दिलेलं आहे की ज्या गाळेधारकांची गाळे गेलेली आहेत त्या मुळ मालकाला टी.डी.आर द्यायच्या आधी तुमची एनओसी लागेल मला एक सांगा साहेब महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियमाच्या अंतर्गत ते तुम्ही करु शकाल का? जो मुळ मालक आहे तो तुमच्या ऊरावर येऊन बसेल माझी जागा मला पाहिजे ती द्या. तुम्हाला द्यावी लागेल तेव्हा तुम्ही काय करणार. हे असे दिशाभूल करणारे चर्चे आहेत हे चुकीचे आहे. आमच मत एकच आहे साहेब विकास करा आम्ही तुमच्या बाजुशी खंबीरपणे उभे राहू मात्र पूर्णपणे प्रक्रिया करुन करा भूसंपादनाची कारवाई करा एम.आर.टी.पी.आय. अंतर्गत पूर्ण कार्यपध्दत कम्पलीट केल्यानंतर आज तुम्ही त्या लोकांना बेघर करायला पाहिजे होतं त्याच्याआधी तुम्ही ज्या पध्दतीने कारवाई केली ती साहेब नियमबाह्य कारवाई आहे कुठेतरी प्रशासन मोठ्या प्रमाणात चुकला तर ते का चुकला कुणाच्या दबाव तंत्राखाली चुकला त्याचे मी भाषण आज इथे करणार आहे हे लोकांच्या समोर आहे ते या शहरामध्ये त्याचं वातावरण विचित्र गेलेलं आहे एक वेगळा मॅसेज गेलेला आहे. म्हणून साहेब केलेली कारवाई तर तुम्हाला थांबवावीच लागेल. ज्यांच नुकसान केले आहे त्यांना पूर्ण स्थापित करा कारण त्यांना तुम्हाला त्यांच्यावरची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. ज्यांच तोडणार त्यांची काय प्रक्रिया पूर्ण कराल तुम्ही त्यांना पूर्ण स्थापित करावे लागणार आहे. काय ठराव केला ते आम्हाला ऐकू आले नाही काहीतरी भाड्याच आणि वगैरे असं काही तरी केले आहे. कदाचित चांगलंच केलं असेल वाईट तर करुच शकत नाही मात्र ते करण्याच्या आधी त्यांना त्याची मंजूरी पाहिजे ना. जे काही तुम्हाला नविन करायचे असतील त्याच्या आधी साहेब परिपूर्णपणे कारवाई करावी लागेल ते सुध्दा तुमच्याच विधी विभागाने साहेब विधी विभागाने आपल्याला एक पत्र सुध्दा सादर केले आहे. १५/६/२०१६ रोजी विधी विभागाने तुम्हाला एक पत्र सुध्दा सादर केले आहे. त्याच्यामध्ये शहनाज को.ऑ.हौ.सोसायटी ते कोर्टात

गेलेले आहे आणि कोर्टाने तशी त्यांना सूचना केलेली आहे की तुम्ही भूसंपादनाची कारवाई वगैरे केल्यानंतर तुम्हाला या विषयावर निकाल काय असेल ते देऊ साहेब हे सगळ काही आपल्या समोर असते आणि मला वाटते प्रशासन परिपुर्णपणे अभ्यासू असतो हे सगळ काही तुमच्या समोर असताना अशा प्रकारची कारवाई तुम्ही या शहरामध्ये चालवली साहेब हे नियमबाह्य होत आम्हाला तुमच्यापासून अनुभवी अधिकाऱ्यापासून अशी अपेक्षा नव्हती. काही वेळ आधी रोहिदास काकांनी एक अधिकारी नेमा साहेब. अधिकारी नेमा अधिकारी याच्यासाठी नेमा की त्याने सर्व्हेक्षण करावे. खरोखर आता त्याच्यावरती ज्यांच्यावरती अन्याय झालेला आहे त्यांना न्याय मिळवून द्यावं त्यांना न्याय द्यावा. साहेब हे शहर आम्ही घडवला आहे. आपण येणार आणि जाणार अधिकारी येतात आणि जातात त्यांच टर्म संपल त्यांचा कार्यकाल संपला की ते जातात. ते जातात म्हणजे काय दुसरीकडे कुठे जातात मग आता हा शहर आमचा आहे साहेब आम्हाला लोकांना उत्तर द्यायची आहेत ही आमची लोक आहेत. हे गोरगरिब ज्यांच्यावरती हा अन्याय झालेला आहे ना साहेब त्यांचे अश्रु आम्ही बघू शकत नाही. त्यांचे उद्ध्वस्त केलेले संसार त्यांचा उद्ध्वस्त केलेला कामधंदा पोटापाण्यापासून ते लाचार झालेले आहेत अशा विषयावर आपण गांभीर्यपूर्वक विचार करावा सहानुभूतीपूर्वक विचार करावा धन्यवाद.

अनिल भोसले :-

महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो बराच उशीर का होईना पण परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद. मिरा भाईंदर शहरामध्ये १९९७ ला विकास आराखडा आला आणि १९९७ च्या नंतर आज आपल्या मार्गदर्शनाखाली या शहरामध्ये रस्ते व्हावेत मा. कमिशनर आणि बांधकाम विभाग ज्यांनी ज्यांनी या कारवाईमध्ये सहभाग केला त्यांना मी धन्यवाद यासाठी देईल की जे १९९७ पासून आतापर्यंत जेवढे लोक मेली आणि त्यांना कुठेतरी रस्ता होतो म्हणून न्याय मिळाला असे मला वाटते. १९९७ पासून इथे सत्तेमध्ये बरेच उलाढाल्या झाल्या डी.पी. आराखडा जुबेरजी आपण बोललात १९९७ ला रस्त्याचा आराखडा आला १९९७ पासून या ठिकाणचे गार्डन्स या ठिकाणचे प्ले ग्राऊंडस् या ठिकाणचे डी.पी. डी.पी. मध्ये जी बांधकाम झाली अपवाद जे काही आहे काही गावकरी स्थानिक ६०-७० वर्षापासून इंडस्ट्रीवाले काही बिल्डींगवाले काही घरवाले जुने आहेत. पंचायत समितीपासून आहे हे खरं आहे. पण पंचायत समितीपासून राहणारे लोकांची टक्केवारी किती आणि १९९७ पासून आतापर्यंत त्या डी.पी. रस्त्यामध्ये गार्डनमध्ये प्ले ग्राऊंडमध्ये वसलेले लोकांची वस्ती किती. कारण १९९७ पासून जे सत्तेमध्ये होते जे प्रशासनामध्ये होते त्यांनी त्यावेळेला डोळे उघडले असते आता अन्याय झाला म्हणून आपण पूर्ण शहरामध्ये बोंबलतोय. तर तेवढ्या लोकांवर अन्यायच झाला नसता अस माझ स्पष्ट मत आहे. कारण ज्या डी.पी. मध्ये बांधकाम झाली त्या डी.पी. मध्ये बिल्डींग झाल्या त्या बिल्डींगला त्यावेळी जर अडवल असतं त्यावेळेला बांधूच जर दिले नसते तर आज मोबदल्याचाही प्रश्न आला नसता. शासनाच्या पैशाचा प्रश्न आता नसता आणि आज जे पूर्ण शहराला वेठीस धरले जात आहे ते वेठीस धरले गेले नसते. आताही कमिशनर महोदय आपण रस्त्याचे विषय जे घेतले खूप चांगले आहेत. पण या ठिकाणी एक कळकळीची विनंती आहे सभागृहाच्या वतीने विनंती आहे कारण आपण डी.पी. मध्ये जेवढे रस्ते तोडलेले आहेत. सर्वप्रथम नंबर एक चा माझा मुद्दा आहे या शहरामध्ये तोडलेले लोकांचे गाळ्यांची इथे एक लिस्ट बनण्याची आवश्यकता आहे. नंबर दोन आणि हे महानगरपालिकेने कुणीही सुचविल्यामुळे करायच नाही प्रशासन म्हणून आपण हा निर्णय घेतला आहे. या शहरामध्ये बदलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये अडचणी दूर करण्याचा हे कर्तव्य आपलच आहे. नंबर २ जे घरधारक आहेत ज्यांची घरे गेली जस जुबेरजी बोलले की बहुत लोगोने बोला की रस्ता बेघर करण्याचं पाप अगर कुणी केल आहे तर ते आपण केलय कारण हे पाप थांबवण्याचं काम आपण त्यावेळेला जर केल असतं तर या शहरात पाप झालं नसते आणि अनेक लोक बेघर झाले नसते. जुबेरजी हे मी तुम्हाला सांगु इच्छितो. आणि गल्लोगल्ली या झोपडपट्टीवासामध्ये ज्या लोकांची झोपडे तुटली आहेत त्यांचा सर्व्हे महानगरपालिकेने लवकरात लवकर करावा. मी आमदारांना धन्यवाद देईन कारण आमदार महोदयांनी जोपर्यंत बेघर झालेल्या लोकांचे घर मिळत नाहीत तोपर्यंत ५००० रु. भाडे हे घर धारकासाठी आणि शॉपवाल्यांसाठी १०००० भाड्याचा जो ठराव आणला आहे. त्यासाठी मी भारतीय जनता पार्टीच्या वतीने सर्व सदस्यांच्या वतीने त्यांना धन्यवाद देईन.

निलम ढवण :-

भोसले साहेब युतीचा शब्द वापरा अनुमोदन मी दिले आहे.

अनिल भोसले :-

मी शिवसेना भाजप युतीच्या वतीने धन्यवाद देईल कारण ज्यांच्या सत्तेमध्ये जे लोक वसली ज्यांच्या सत्तेमध्ये असताना हे लक्ष दिले नाही त्यामुळे अनेक या शहरामध्ये बेघर होण्याची जी परिस्थिती आली त्याला कारणीभूत आम्ही नाही साहेब. आपण याच्यात सदस्य अगोदरही होतात आपले महापौर होते, आपले आमदार होते. राज्यामध्ये सत्ता आपली होती, केंद्रामध्ये सरकार आपले होते त्यावेळेला आपण ते लक्ष दिले नाही.

(सभागृहात गोंधळ)

अनिल भोसले :-

या शहरामध्ये जेवढे डी.पी. रोड तोडले त्यांचे सर्व्हे करुन त्यांना लवकरात लवकर भाडे मिळवून देणे नंबर २ व्यापाऱ्यांना त्यांचे भाडे मिळवून देणे आणि ज्या युध्दपातळीवर आपण तोडले त्या युध्द

पातळीवर आपण त्यांना घरे आणि व्यवसायी गाळे देणार त्यासाठी प्लानिंग करुन लवकरात लवकर काम करणे.

(सभागृहात गोंधळ)

अनिल भोसले :-

डी.पी. रोड मध्ये आणखी बरचसं बांधकाम तोडायचं बाकी आहे आणि विकास होणार नाही त्या लोकांच लवकरात लवकर नियोजन करावे.

मा. महापौर :-

भोसले आपण तसा ठराव मांडलेला आहे. आपण बसुन जा.

ध्रुवकिशोर पाटील :-

मा. महापौर मॅडम आपने जो बोलने का मौका दिया धन्यवाद आप मुझे टाईम बताइए १० मिनिट, ५ मिनिट, १५ मिनिट।

मा. महापौर :-

नही नही आप बोलिए शॉर्ट में बोलिए। कुछ रिपिटेशन मत करिए।

ध्रुवकिशोर पाटील :-

रिपिटेशन नही कर रहा हूँ। जैसे भोसलेजी ने बोला की हमारे आमदारजी का अभिनंदन करना चाहिए। बहुत सही बात है। यही तो हम सर आपके उपर आरोप लगा रहे है की आप आपके खुदके हिसाब से अतिक्रमण को या रस्ता रुंदीकरण नही कर रहे है। इन्होंने बोला इसलिए रस्ता रुंदीकरण कर रहे है। और वो भोसलेजीने बोल दिया है। इस शहर मैं २ आमदार है।

(सभागृहात गोंधळ)

अनिल भोसले :-

भाडे का जो ठराव है उसके लिए उनका अभिनंदन किया मैंने। जो लोगो का घर टुटा हुआ है उनका भाडा मिलना चाहिए उसके लिए मैंने अभिनंदन किया है।

दिनेश नलावडे :-

भोसले साहेब तुम्ही अभिनंदन कशाला करता. काय भलं केले अभिनंदन करण्यासाठी.

राजेंद्र जैन :-

यह पहली महापौर है जो अपने हिसाब से बैठती है, रिस्क लेती है वो मोबाईल लेके नही बैठती महापौर। हमारी महापौर स्वतंत्र विचारों की है।

ध्रुवकिशोर पाटील :-

देखो महापौर मॅडम हम तो आपकी बात मानते है। आपने बोला हम बोलते है, आपने बोला बैठ जाओ हम बैठते है लेकिन........

मा. महापौर :-

आप मुद्दे पे बोलिए।

ध्रुवकिशोर पाटील :-

मैं मुद्दे पे ही आ रहा हूँ मॅडम की यह जो रस्ता रुंदीकरण की कारवाई जी झालेली आहे ती चुकीची आहे. रस्ता रुंदीकरण झालं पाहिजे याबद्दल आमचं दुमत नाही. परंतु साहेबांनी आयुक्त साहेब ज्यावेळी फिरत होते त्यावेळी फक्त एकच आमदारांना घेऊन फिरत होते. दुसरे आमदारांना का घेऊन फिरत नव्हते. त्यांचा पण मतदार संघ आहे पण त्यांनी त्यांना सांगितल नाही. आयुक्त साहेब आपण ज्या पोटतिडकीने बोलतात की काशिमिरा रस्ता जाम होता अर्धा तास मला लागला सर प्रशासनाच काम आहे सत्ताधाऱ्यांचे काम आहे की तुम्ही अल्टरनेट रस्ते पर्यायी रस्ते उभे करा. आज काशिमिरा रोड जो सर्व्हिस रोड आहे त्याच काम तुम्ही वार फुटींग सुरु केले पाहिजे होते. पण ते तुम्ही करु शकला नाहीत. म्हणजे तुम्ही वार फुटींग वरती चालु केले पाहिजे. पण तुम्ही ते चालु केले नाही म्हणजे याच्यामध्ये तुमचे अपयश आहे. तुम्ही जे आज साहेब बोलतात की ते मी अनधिकृत तोडलेले आहे साहेब पण जे अनधिकृत बांधकाम झालेले आहे त्याला जबाबदार तुमचे अधिकारी पण आहेत मग तुम्ही जर त्या लोकांचे अनधिकृत बांधकाम तोडत आहेत मग त्या अधिकाऱ्यांवर पण तुम्ही कारवाई केली पाहिजे ना. ती कारवाई तुम्ही का नाही करत डी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये लिहिलेले आहे. की जो प्रभाग अधिकारी जो इन्चार्ज हे अनधिकृत बांधकामाला संरक्षण देत आहे. त्याच्यावरती पण कारवाई झाली पाहिजे. तुम्हालाच जर माहित आहे तिकडे अनधिकृत बांधकाम होत आहे त्याच्यावरती पण तुम्ही कारवाई केली पाहिजे होती. परंतु तुम्ही या मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांना त्रास दिला त्यांच लाखो रुपयाचे नुकसान केले आणि आपल्या अधिकाऱ्यांना अभय दिले. साहेब आज तुम्ही जे रोड मार्किंग करता तुम्ही जे रोड वाईंडिंग करता साहेब पण त्या रोडचा तुम्हाला डी.आय.एल.आर केला पाहिजे होता. तुम्हाला त्या गर्व्हमेंटच्या अधिकाऱ्यांकडून ते केले पाहिजे होते. तुम्हाला एक्झॅक्टली माहित पाहिजे. साहेब आज तुम्ही लियाकत शेखच्या याच्यामध्ये तुम्ही घुसतात आणि मला सोडले साहेब हे चुकीच आहे. आज तुम्ही ते रस्ता रुंदीकरण करताना कितीतरी अन्याय केला आहे. साहेब आज तुम्ही गेले लाल चौकडी मारली आणि उद्या तुम्ही डायरेक्ट जे.सी.बी. घेऊन आलात. साहेब ते

तोडलेले आहे तुम्ही जर सांगितल असतं तर त्या लोकांनी त्या गाळेधारकांनी आपोआप आपली अतिक्रमण आपले दुकान, आपले घरं कमी केली असती. साहेब तुम्ही अजिबात तस नाही केल. तुम्ही वॉर्न दिला. साहेब आज मिरा भाईंदरची जनता आणि जे नगरसेवक आहेत ते शांत आहेत. तुम्हाला सहकार्य करतात आणि म्हणून तुम्ही हे करु शकलात जर समजा आम्ही जर तुम्हाला सहकार्य नाही केलं असत तर तुम्ही एक वीट सुध्दा तोडू शकला नसता. साहेब ही आमची गॅरेंटी आहे. आणि आज मिरा भाईंदरची जनता एवढी शांत आहे ना साहेब तेवढी ही रस्त्यावर उतरायला मागे पुढे पाहणार नाही. तुम्ही करताना फॉलो ड्यू प्रोसेस ऑफ लॉ तुम्ही आज बोललात की ते नलावडे साहेबांचे ड्यु प्रोसेस लॉ केले अजूनही काम झाले नाही. साहेब तुम्ही जर विश्वासात लोकांना घेतल ना तर तुमच रस्ता रुंदीकरण इझीली होईल. आम्ही सगळे नगरसेवक तुम्हाला को-ऑपरेशन करायला तयार आहोत. परंतु साहेब चुकीच करु नका साहेब तुम्ही आज जो गोषवारा आणलेला आहे.

ध्रुवकिशोर पाटील :-

एक सिव्हील इंजिनिअर आहे, एक मॅनेजमेंटमध्ये आहे. आम्ही निवडून आलेलो आहोत. साहेब आम्हाला तेवंढ नॉलेज नसत तुम्हाला नॉलेज आहे तुम्ही हे धोरण निश्चित करायला पाहिजे होत. की, आज आम्ही ज्या रोड वायडिंगमध्ये बाधित आहे त्यांना आम्ही तोडतोय तर त्यांना आम्ही हा मोबदला देऊ शकतो या लोकांना आम्ही मोबदला देऊ शकत नाही. आम्ही एक टी.डी.आर देऊ शकतो. आम्ही पैसे देऊ शकत नाही. साहेब आज तुम्ही जे रोड वायडिंग केले आहे. हा रोड बनवण्याकरिता तुमच्याकडे पैसे नाहीत अशी परिस्थिती आहे. मग आज जो सत्ताधारी पक्षांनी ठराव मांडलेला आहे की, आम्ही १०,००० रू. भाडे देऊ ५,००० रू. भाडे देऊ २०० फुट जागा देऊ. साहेब ते कसे पॉसिबल आहे.आज ह्यांनी ठराव केला आणि या ठरावाची अंमलबजावणी करण्याकरिता आपल्याकडे ते अधिकार पण असतील कारण की महापौर मॅडम तुम्ही सांगितल होत की यथावकाश आम्ही लोकांना सदनिका देऊ दुकान देता येईल साहेब पण तुम्ही मला सांगा एखाद्याचे दुकान तोडल त्याला रस्त्यावर आणल आणि तुमचे ते यथावकाश ५ वर्षानी ६ वर्षानी जर होईल तर सर कस होईल त्यांच्या पोटापाण्याचे काय? त्यांचा संसार रस्त्यावरती येईल ना साहेब. साहेब आज तुम्ही बघा नागपुर म्युन्सिपल कार्पोरेशनचे तुम्ही इकडे आयुक्त म्हणून आलात बरोबर की नाही म्हणजे इथे खुर्ची खाली केली शासनाने आणि म्हणून तुम्ही इथे बसलात. साहेब त्याप्रमाणेच तुम्ही ज्या लोकांच तोडतात ना त्याचा अगोदर पहिले बंदोबस्त करा. अणि नंतर खुशाल तोडा रस्ता रूंदीकरण आमचे काहीच म्हणणे नाही. टी.डी.आर आणि तुम्ही जे म्हणता चटई क्षेत्र ते पॉसिबल नाही कारण तुमचं मिरा भाईदर शहर हे गावाचे शहर झाले आहे.

भगवती शर्मा :-

मा. महापौर मॅडम जो लोगोने बोला मैं वापस किसीका रिपिट नही करूंगा उसमे बहोत वक्त जा रहा है। अभी जो आगे के अंदर में कारवाई होनी है उसके लिए में महापौर मॅडम आपके माध्यमसे ध्यान दिलाना चाहता हूँ जैसे एक विषय आया सर्विस रोड का काशिमिरा रोड का आपण साडेतीन करोडका पिछली बार महासभा के अंदर में दसवे महिने में मंजूरी दि थी। मा. महापौर मॅडम आपके माध्यमसे आपका ध्यान ॲडजस्ट करना चाहता हूँ की वहॉपें जो अतिक्रमण हूए है जैसे आपने अभी कहॉ तो कम से कम वहॉ भी यह कारवाई करते तो यह शहर का एकदम सुशोभिकरण होता आज भी पेपर में बातमी आ रही है। की सर्विस रोड के उपर के अंदर में अनधिकृत बांधकाम की महिनो भर से बातमी आ रही है लेकीन कोई ॲक्शन नही लिया जा रहा है। पेहले वहॉ मार्बल की दूकान थी फिर शोरूम कर दिया गया ग्राऊन्ड फ्लोर थी पेहला माला किया जा रहा है। ७० टक्के बांधकाम पुरा किया गया। बादमे तोडोंगे तो यह नुकसान होता है।नुकसान तो नुकसान है। किसीका भी हो तो इसके लिए समय रहते वहॉ कारवाई करेंगे तो अच्छा होगा। दूसरी बात साहब जो रोड की रिमार्केशन की बात आ रही है मैने देखा है ६० फिट रोड पे भी कई जगह मार्किग की गई थी। लेकीन वहॉ पे सेन्टर देख करके यह रिमार्केशन उस टाईप का नही किया गया। मैने आपको पेहले भी शिकायत की तो कानुनन गट प्लान के हिसाबसे बिल्डींग का प्लान पास किया उसके हिसाबसे वहॉपे जगहपे मौजूद सर्वे करके उसके उसके बाद पता चलना चाहिए कि किसने वहॉ पे अतिक्रमण किया किसने नही किया है। किसने ५ फिट किया है किसने १० फिट किया है।खाली मनमानी से वॉर्ड ऑफिसर जाते है वहॉपे मार्कीग कर आते है यह अनुचित है इसलिए वो कायदे के हिसाब से जिसने जो अतिक्रमण किया है। जैसे अभी इन्होने बोला डी.आय.एल.आर. वो करके इसके बाद के अंदर मे मार्किग किया जाए क्योंकी लोगो के अंदरमे असंतोष ना हो। कोई बोल रहा है हमारा इतना जा रहा है जब की हम तो इतने थे नही तो उसकी पुर्न खात्री करके उसके बादमे यह किया जाए। तिसरी बात साहब में यह कहती हूँ की जैसे इन्होंने कहॉ ९७ से अंमलबजावणी डी.पी. प्लान की गावठण जो हमारे पुरे मिरा भाईदर में से है वो भाईदर (प.) का गावठण है काशिमिरा का हो काशी गाव का हो चाहे खारीगाव का हो। इन गावठणो के उपर के अंदर में जो जिस समय के अंदरमे इ.एल.यू. एक्झीस्टींग लेन्थ युथ बताया गया है। आज भी वहॉ पे वैसे है उपने रोड जो बताये गए थे उतने रोड आज भी है लेकीन कुछ कमसे कम उन गावठणों को में एक बताना चाहता हूँ आपने ठराव के अंदर में यह लिखा है की नही लिखा है। मै नही जानता हूँ लेकीन उन गावठणों को कमसे कम छोडा जाए क्योंकी वा एक धरोवर है मिरा भाईदर में। मिरा भाईदर के जितने भी गावठण है कमसे कम इनका सबका वहॉंपे पालन किया जाना चाहिए। एक बात और बता देना चाहता हूँ की रास्ते रूंदीकरण के नाम के अंदर में कई जगह के अंदर में आपको शिकायत आयी

थी की इसके उपर में थोडी सावधानी लेनी होती है की जो नाम फलक साथ के अंदर में हुआ है कई जगह हुआ है इसके आगेसे सावधानी रखे जो हो गया वो हो गया करके लेकीन अपना एक बांधकाम विभाग का कर्मचारी अधिकारी भी वहाँ रहता है उसको सुचना दे कर के कि एक दिन में दो दिनमें हटा करके दुसरी जगह शिफ्ट किया जा सकता है तो एक पैसे को नुकसान महानगरपालिका मतलब आम जनता का नुकसान आगे के अंदर में इनका क्या?

मा. आयुक्त :-

मा. महापौर मॅडम आपल्या सभागृहाची भावना मी लक्षात घेतलेली आहे आणि सगळयात महत्त्वाचा विषय आता मी प्रत्येकाच्या प्रश्नावर उत्तर देणार नाही पण मला जे वाटत त्याच्यातल्या काही २-४ गोष्टीचा खुलासा सगळ्यासमोर करू इच्छितो ज्या लोकांचा रस्ता रुंदीकरणमध्ये घर बाधित झालेल आहे त्यांना घर देण्याच शासनाच्या नियमाप्रमाणे जे अनुज्ञेय घर आहे तर ते घर आम्ही देऊ केलेल आहे. आता मिरारोडला जवळपास २७-२८ लोकांची घरे आहेत त्यांना आम्ही घरे देतोय मुशी कम्पाऊन्डमध्ये माझ्याकडे १० प्रपोजल आले त्याला आम्ही घरे देतोय आणि ज्याची डी.पी. प्लान मध्ये जागा गेलेली आहे त्याला टी.डी.आर. द्यायचे प्रोव्हीजन आहे त्यांनी प्रस्ताव आमच्याकडे सादर करावा डी.पी. मध्ये त्यांचे किती घर गेल म्हणजे तोडून जागेवर कळणार नाही पण तोडल्यानंतर त्याच डी.पी. वरती लक्षात येत आपल्याला की याची जागा मुळात होती किती आणि यांची आपल्या रस्ता रूंदीकरणात किती गेली त्याचे प्रपोजल त्यांनी आपल्याकडे दाखल केल्यानंतर आपण त्यांना टी.डी.आर. देणार आहे आणि घराला घर देणार आहे आणि राहिला प्रश्न ज्या दुकानदारांचा तो धोरणात्मक निर्णय महासभेना घ्यायचा. कायद्यामध्ये तरतुद नाही. जुबेरजी आपण बोललात परंतु या ठिकाणच्या पसिध्दीचा आणि इथल्या लोकांचा विचार करून महासभेने याच्यावरती निर्णय घ्यावा म्हणून आम्ही प्रस्ताव आपल्याकडे दिला होता. आज महासभेने ठराव पारित केलेला आहे. त्याच्यामध्ये जर किंतू परंतू आपल्याला वाटत असेल तर त्याची शहानिशा करू आम्ही आणि शहानिशा करून जे काही नियमात असेल ते करण्यात येईल एवढ मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

लियाकत शेख :-

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि. १४/०५/१९९७ रोजी मंजूर होवून दि. १५/०७/१९९७ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि. १५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णयक्र.टिपीएस/१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२ दि. २९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत. महानगरपालिका क्षेत्रात एकूण १९ महसूली गावांचा समावेश असून त्यामधून उत्तन, पाली, चौक, डोंगरी व तारोडी या पाच गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण मोहीम म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती झालेली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासन शहरातील मंजूर आराखड्यातील १७ रस्ते रुंदीकरण करण्याची कामे हाती घेतली आहेत. सदरच्या रस्त्यांवर ग्राम पंचायत काळापासून अस्तित्वात असलेले व्यवसायीक गाळे व रहिवाशी इमारती आहेत व ते सन-१९९७ साली मिरा भाईंदर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा अमंलात येण्या पुर्वीपासुनच आहेत. महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम अंतर्गत बाधीत विकास आराखड्यातील रस्ते भूसंपादन करणे गरजेचे आहे. प्रशासनाला बळजबरीने जागा ताब्यात घेता येत नाही व ताबेधारकाला त्याच्या जाग्यामधून काढून टाकता येत नाही. जागा मालकाला, पट्टा धारकाला भूसंपादनाची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय चटईक्षेत्र विकास हक्क प्रमाणपत्र किंवा बाजारभावानुसारमुल्यांकनीत मोबदला प्रदान करता येत नाही. कोणत्याही स्वरुपाचा मोबदला द्यायचा असल्यास भूसंपदान अधिनियम १९९४ (पुढे काही बदल झाल्यास) व महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९९६ ला अनुसरुन द्यावे लागेल. तसेच भारतीय घटना आर्टिकल ३००अ प्रमाणे कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जाग्यामधून काढता येत नाही. प्रशासनाला आरक्षीत जागा विकसीत करावयाची असल्यास कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणे नियमाप्रमाणे अनिवार्य आहे. याचधर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिकेला मंजूर विकास शहर आराखड्यामधील आरक्षीत जागा भूसंपादन करुन घेण्यासाठी कार्यप्रणाली पूर्ण करावीच लागेल. ज्याअर्थी मूळ जागा मालकाने इमारतीच्या गृहसंकूल संस्थेना किंवा व्यवसायीक गाळे धारकांना जागा हस्तांतर केलेली नाही त्याअर्थी अशा परिस्थितीत लाभार्थ्यांना मोबदल्याच्या स्वरुपात जागा किंवा विकास हक्क प्रमाणपत्र कोणत्या नियमाच्या अखत्यारीत प्रदान करण्यात येईल, हे स्पष्ट होत नाही. मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाने मा. महासभा दि.१५/१०/२०१५ प्रकरण १०६ ठराव क्र.७६ प्रमाणे मिरा भाईंदर शहराची विकास योजना सुधारीत करण्याबाबत इरादा जाहीर करण्याचा ठराव सर्वानुमताने मान्य केलेला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार विकास योजना लागू झाल्यानंतर किमान २० वर्षाहून एकदा किंवा शासन निर्देश देईल त्यावेळेस नियोजन प्राधिकरणाने विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे.शहरामध्ये आरक्षीत क्षेत्रांचे पूर्ण सर्व्हेक्षण तसेच लॅन्ड इन युज या तरतूदीअन्वये आरक्षणाचा फेर विचार करावा लागणार आहे. सदर विकास योजना सुधारीत करण्यासाठी मा. महासभा दि.१८/०१/२०१६ प्रकरण १३२ ठराव १०० अन्वये नगररचना अधिकारीच्या नेमणूकीच्या विषयालाही बहुमताने मंजूरी देण्यात आली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकानवीन विकास आराखडा जवळच्या काळामध्ये पुढच्या २० वर्षासाठी कार्यपध्दत अवलंबून मंजूरीसाठी प्रस्तावित होणार आहे.मनपा प्रशासनातर्फे शहरामधील मंजूर विकास आराखड्यातील रस्त्यांचे रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले

आहे व रस्ता रुंदीकरण करतेवेळी ग्राम पंचायत, नगरपरिषद काळापासून अस्तित्वात असलेले रहिवाशी इमारती व वाणिज्य गाळेआरक्षणास बाधीत होत आहेत त्यांना काढून टाकण्याआधी त्यांचे पुनर्वसन करावे, घरांच्या ऐवजी घरे देण्यात यावीत, दुकाने, गाळे ऐवजी दुकाने, गाळे देण्यात यावे किंवा आर्थिक मोबदला देण्यात यावा. परंतु भुसंपादन अधिनियम १८९४ च्या नविन कायद्याची Land Acquisition Rehabilitation and Resettlement २०१३ च्या तरतुदीनुसार तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने हैद्राबाद महानगरपालिकेच्या विरोधात दिलेल्या न्यायनिवाड्यात आर्थिक मोबदला हा रेडी रेकनरच्या दराप्रमाणे न देता प्रचलीत जास्तीत जास्त बाजार भावानुसार देण्यात यावा असे निर्देश दिले आहेत. अशा परिस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता महानगरपालिकेला आर्थिक मोबदला देणे शक्य वाटत नाही. याउलट सदनिकाधारक, गाळेधारक यांची झालेली नुकसान भरपाई बाजारभावाप्रमाणे रक्कम ठरवून तेवढ्या क्षेत्राच्या बाजारभावाप्रमाणे टी.डी.आर देण्यात यावेत. जेणेकरुन आपला टी.डी.आर विकून इतरत्र ठिकाणी नविन गाळे किंवा सदनिका खरेदी करु शकतील. त्यामुळे त्यांच्यावर अन्याय न होता त्यांना योग्य न्याय मिळेल आणि ते ही मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करतील. हे जरी व्यावहारीक असले तरी एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ नुसार वरील बाब महानगरपालिकेस थोडीशी अडचणीची ठरणार आहे. त्यामुळे त्यांना विकास नियंत्रण नियमावलीचे नियम ३७(१) नुसार शासनाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. अशाच प्रकारच्या बऱ्याच तांत्रिक मुद्यांवर महानगरपालिकेची कुचंबणा होत आहे. आणि यापुढेही होणार आहे. शहराच्या विकासासाठी रस्ता रुंदीकरण ही जरी गरजेची बाब असली तरी त्याचा फटका सर्वसामान्य नागरीकांना बसू नये. तसे वारंवार घडू लागल्यास आपल्यावर अन्याय होत असल्याच्या भावनेतून नागरीकांमध्ये असंतोष निर्माण होऊ शकता व त्याचे गंभीर परिणाम मिरा भाईंदर महानगरपालिकेस भोगावे लागतील. त्यासाठी धोरणात्मक व सर्वोपयोगी निर्णय घेणे आवश्यक आहे. व त्याकामी आम्हास शासनाची, वेळ पडल्यास मा. न्यायालयाचीही परवानगी घ्यावी लागेल. अशा परिस्थितीत शासनाकडे योग्य तो प्रस्ताव पाठविण्याकामी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेचे सर्वपक्षीय आजी माजी आमदार, सर्व गटनेते, सर्व पदाधिकारी, संबंधित अधिकारी, दोन नामवंत वास्तुविशारद, दोन पत्रकार या सर्वांचा समावेश करुन "अभ्यासगट" तयार करण्यात यावा. व या सर्वांनी मिळून दि. ३० ऑगस्ट २०१६ पर्यंत शासनास सादर करण्याचा परिपूर्ण प्रस्ताव महासभेच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा. तोपर्यंत रस्ता रुंदीकरणासाठी सुरु असलेली तोडक कारवाईची मोहिम थांबविण्यात यावी. आज दिनांकापर्यंत तोडक कारवाई मनपाने केलेली आहे. त्यालाही पुर्नप्रस्थापीत करण्यात यावे. सदर विषयाबाबत पिडीतांनी मा. आयुक्तांना अर्ज सादर केलेले आहेत. त्यावर तातडीने वर उल्लेख केल्याप्रमाणे कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.

जुबेर इनामदार :-

माझे अनुमोदन आहे.

प्रमोद सामंत :-

मा. महापौर मॅडम आत्ताच झालेल्या आयुक्तांनी सांगितलेल्या निवेदनाप्रमाणे प्रशासनाने कुठलेही सर्व्हेक्षण न करता केलेल्या तोडक कारवाईबाबत चौकशी करण्यात यावी.

मा. आयुक्त :-

आपल्याला कल्पना नाही मला वाटते सर्व्हेक्षण सगळ केल्यानंतरच काम केले आहे.

प्रमोद सामंत :-

तसेच दमदाटी करून धमकी देऊन गाळे खाली करणाऱ्या अधिकाऱ्यावरती योग्य कारवाई करण्यात यावी. तोडायच्या बांधकामावरती कारवाई करताना संपूर्ण बांधकाम ज्या ठिकाणी पडलेल असेल किंवा पाडणार असेल अशा बांधकामची चौकशी करण्यात यावी अशी मी सुचना मांडतोय.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. ३५ करिता दोन ठराव आलेले आहेत पहिला ठराव सुचक श्री. नरेंद्र मेहता दुसरा ठराव सुचक लियाकत शेख. लियाकत शेख ह्यांचा ठराव मतदानास टाकतो. सुचक श्री. लियाकत शेख यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत.

मा. महापौर :-

श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४१ विरोधात २६ इतकी मते पडली आहेत. श्री. नरेंद्र मेहता यांनी मांडलेला ठराव बहुमताने मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. ३५ :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास योजनेतील रस्ते, रुंदीकरण, नविन रस्ते आरक्षणामध्ये बाधित होणाऱ्या बाधितांना मोबदला देणेबाबत.

ठराव क्र. ३४ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना राज्य शासनाने १९९७ मध्ये मंजुर केलेली असून सदर विकास योजनेची अंमलबजावणी २० वर्षात करावयाची आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या व नागरीकरण पाहता सद्यस्थितीत शहरातील रस्ते विकास योजनेतील रुंदीप्रमाणे तयार करुन वाहतुक रहदारीस वापरण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यानुसार शहरातील रस्ते रुंदीकरणाची

मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. शहरात रुंदीकरणासाठी हाती घेतलेल्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे तसेच धोकादायक इमारती आहेत. रस्ता रुंदीकरण, नव्याने रस्ते तयार करणे, आरक्षणे विकसित करण्यासाठी सदर रस्ते व आरक्षणावरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे हटविताना संबंधिताना योग्य मोबदला देण्याची आवश्यकता आहे. विकास योजनेतील रस्ता रुंदीकरण तसेच नविन रस्ते, आरक्षणाने बाधित क्षेत्रासाठी मंजुर विकास नियंत्रण नियमावली प्रमाणे लगतच्या उर्वरीत जागेमध्ये अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक किंवा जागेच्या मालकी हक्काबाबतच्या अद्यावत कागदपत्रांसह परीपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर विकास हक्क प्रमाणपत्र देण्याची तरतुद मंजुर आहे. तसेच ज्या संबंधिताच्या सदनिका, दुकाने, गाळे पूर्णतः बाधित होत असतील अशा संबंधिताना नियमानुसार पात्रता ठरवून महानगरपालिकेकडे उपलब्ध होणाया जागेत यशावकाय व प्राधान्य क्रमानुसार सदनिका, दुकाने देता येतील. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरणात तसेच आरक्षणात बाधितांची तपासणी करुन यादी तयार करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

प्रशासनाच्या वरील प्रस्ताव पाहता सदर प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे धोरण निश्चित करण्यात येत आहे.

१) विकास योजनेतील रस्ता रुंदीकरण, आरक्षण यामध्ये संपुर्णतः बाधित झालेल्या ०१/०१/२००० पुर्वीच्या सदनिका, दुकाने, गाळे धारकांना विकास हक्क प्रमाणपत्र देऊन जागा हस्तातंर करुन घेण्यात यावी अथवा सदर जागेचे हक्क महानगरपालिकेकडे हस्तातंर करुन घेऊन त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी. सदर जागेचा एफ.एस.आय./टी.डी.आर. त्या व्यक्तीस किंवा अन्य व्यक्तीस महानगरपालिकेच्या परवानगी शिवाय देण्यात येऊ नये.

किंवा

२) ज्या बाधितांची जागा शिल्लक आहे. त्यांना उर्वरित जागेमध्ये अतिरिक्त चटई क्षेत्र देऊन बांधकाम परवानगी देण्यात यावी.

किंवा

३) महानगरपालिकेकडे बाधितांना देण्यासाठी बांधकाम क्षेत्र उपलब्ध झाल्यास त्यांना २६९ चौ.फुट क्षेत्राच्या (कारपेट) सदनिका कायमस्वरूपी देण्यात याव्यात तो पर्यंत पूर्णतः बाधितांना रु.५०००/- प्रति महीना भाडे देण्यात यावे.

किंवा

४) ज्या गाळेधारकांची (दुकानदाराची) जागा २०० चौ.फुट किंवा त्यापेक्षा जास्त गेलेली आहे अथवा जाणार आहे, त्यांना जास्तीत जास्त २०० चौ. फुट क्षेत्राचे बांधकाम क्षेत्र देण्यात यावे व २०० चौ. फुट क्षेत्रापेक्षा कमी जागा बाधित होणाया गाळेधारक/ दुकानदारांना त्यांचे जेवढे क्षेत्र बाधित होत आहे, त्या क्षेत्रा ऐवढे बांधकाम क्षेत्र कायमस्वरूपी देण्यात यावे. त्यापेक्षा जास्त बांधकाम क्षेत्र उपलब्ध असल्यास संबधितास जास्त बांधकाम क्षेत्र विकत घ्यावयाचे असल्यास चालू बाजार भावानूसार (Ready Recknor)दर आकारून जागा कायमस्वरूपी देण्यात येईल, तो पर्यंत पूर्णतः गाळा/ दुकान बाधितांना २०० चौ.फुट क्षेत्रासाठी रु.१०,०००/- प्रति महिना व त्यापेक्षा कमी क्षेत्र बाधित होत असल्यास त्याप्रमाणात भाडे देण्यात यावे.

५) रस्ता रुंदीकरण, नविन रस्ते व आरक्षणात कारखान्यांची जागा बाधित होत असल्यास बाधितांना त्यांच्याकडील बाधित होत असलेल्या क्षेत्रा ऐवढे बांधकाम क्षेत्र व ५०० चौ.फुट क्षेत्रापेक्षा जास्त जागा बाधितांना जास्तीत जास्त ५०० चौ.फुट बांधकाम क्षेत्र उपलब्ध असल्यास संबधिताना सदर बांधकाम क्षेत्र विकत घ्यावयाचे असल्यास चालू बाजार भावानूसार (Ready Recknor)दर आकारून जागा कायमस्वरूपी देण्यात येईल, तो पर्यंत पूर्णतः कारखान्याची जागा बाधितांना ५०० चौ.फुट क्षेत्रासाठी रु.१०,०००/- प्रति महिना व त्यापेक्षा कमी क्षेत्र बाधित होत असल्यास त्याप्रमाणात भाडे देण्यात यावे.

६) सद्यस्थितीत महानगरपालिकेकडे पर्यायी जागा देण्यासाठी व्यवस्था नसल्याने बाधित झालेल्या सदनिका, दुकाने, गाळे धारकांकडील कागदपत्रांची छाननी व तपासणी करून पात्रता यादी तयार करण्यात यावी व संबधिताना प्राधान्य क्रमानूसार त्यांचे वाटप करण्यात यावे.

७) महानगरपालिकेमार्फत रस्ता रुंदीकरण व आरक्षण पूर्णतः बाधित झालेल्या सदनिका, गाळे, दुकाने यांना कायमस्वरूपी पर्यायी जागा देण्यात येणार नाही तो पर्यंत त्यांना भाडे देण्यात यावे.

८) बाधित सदनिका धारकांना रु. ५०००/- प्रति महीना व दुकानधारक तसेच फॅक्टरी धारकांना रु.१०,०००/- प्रति महीना भाडे देण्यात यावे.

९) वरील प्रमाणे सर्व बाधितांना पर्यायी जागा हस्तांतर करताना कायदेशिर बाबी पार पाडण्यासाठी सदर जागेची किंमत रु.१००/- ठरविण्यात येत आहे.

१०) ज्या बांधकामाच्या प्रकरणात मा. न्यायालयाने कारवाईचे आदेश दिले असतील अथवा मा. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारवाई केली असेल किंवा न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहून तोडण्याची कारवाई केली असेल अशा बांधकामाचे पूर्नःवसन करता येणार नाही.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व रस्ते रुंदीकरण, रस्त्यामधील बांधकाम, आरक्षणातील बांधकाम यामध्ये बाधितांना वरील प्रमाणे मोबदला देण्याच्या धोरणास व पर्यायी जागा वाटपास ही सभा मंजूरी देत

असून धोरणाची अंमलबजावणी करण्याचे तथा धोरणात शिथिलता आणून योग्य निर्णय घेण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना देऊन प्राधिकृत करीत आहे. पर्यायी जागा उपलब्ध करून देईपर्यंत द्यावयाच्या भाड्याची रक्कम संबधित बाधितांना अदा करण्यासाठी सन २०१६-१७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात विकास आराखडा अंमलबजावणी या लेखाशिर्षातील विकास आराखड्यात जागा संपादन करणे या उपशिर्षात विकास आराखडा जागा संपादन करणे/मोबदला देणे अशी दुरुस्ती करण्यास व सदर उपशिर्षात सुधारीत विकास आराखडा तयार करणे या उपशिर्षातील रु. १.०० कोटी पुर्वविनियोजनाद्वारे वर्ग करण्यास तसेच अंदाजपत्रकात अखर्चित राहणाया तरतुदीमधुन देखील पुर्नविनोजन करण्यास मा. आयुक्तांना अधिकार देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- श्रीम. निलम ढवण

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता नरेंद्र लालचंद | १ | सय्यद नुरजहॉ नझर हुसेन | |
| २ | शरद केशव पाटील | २ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | ग्रिटा स्टिफन फॅरो | |
| ४ | म्हात्रे कल्पना महेश | ४ | भावसार शिल्पा कमलेश | |
| ५ | भानुशाली वर्षा गिरीधर | ५ | पाटील वंदना विकास | |
| ६ | मीरादेवी रामलाल यादव | ६ | प्रभात प्रकाश पाटील | |
| ७ | डॉ. नयना मनोज वसाणी | ७ | पाटील सुनिता कैलास | |
| ८ | सिमा कमलेश शहा | ८ | झिनत रऊफ कुरेशी | |
| ९ | जैन गिता भरत | ९ | पुजारी कांचना शेखर | |
| १० | अरोरा दिपिका पंकज | १० | पिसाळ मनिषा नामदेव | |
| ११ | रावल भगवती जयशंकर | ११ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १२ | मेहता डिंपल विनोद | १२ | वंदना रामदास चक्रे | |
| १३ | मेघना दिपक रावल | १३ | काझी रशीदा जमील | |
| १४ | शर्मा सुनिला सत्येंद्र | १४ | बगाजी शर्मिला विल्सन | |
| १५ | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | १५ | इनामदार जुबेर | |
| १६ | सुजाता रविकांत शिंदे | १६ | वेतोसकर राजेश शंकर | |
| १७ | सिंग मदन उदितनारायण | १७ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | |
| १८ | कांगणे यशवंत ठकाजी | १८ | सुर्यकांत खंडोजी म्हात्रे | |
| १९ | अनिल बाबुराव भोसले | १९ | सामंत प्रमोद जयराम | |
| २० | कासोदरीया अश्विन श्यामजी | २० | रकवी सुहास माधवराव | निरंक |
| २१ | जैन रमेश धरमचंद | २१ | पांडे हंसुकुमार कमलकुमार | |
| २२ | डॉ. राजेंद्र जैन | २२ | खण्डेलवाल सुरेश | |
| २३ | निलम हरिश्चंद्र ढवण | २३ | वेंचर गिल्बर्ट मेन्डोंसा | |
| २४ | तारा विनायक घरत | २४ | डॉ. आसिफ गुलाब शेख | |
| २५ | शुभांगी महिन कोटियन | २५ | लियाकत ग. शेख | |
| २६ | जयमाला किशोर पाटील | २६ | भोईर कमलेश यशवंत | |
| २७ | परमार अनिता भरत | | | |
| २८ | पाटील प्रणाली संदिप | | | |
| २९ | गावंड मंदाकिनी आत्माराम | | | |
| ३० | संध्या प्रफुल्ल पाटील | | | |
| ३१ | दळवी प्रशांत ज्ञानदेव | | | |
| ३२ | हरिश्चंद्र रामचंद्र आमगावकर | | | |
| ३३ | प्रविण मोरेश्वर पाटील | | | |
| ३४ | ठाकुर अरविंद दत्ताराम | | | |
| ३५ | शाह राकेश रतिशचंद्र | | | |
| ३६ | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | | | |
| ३७ | केळूसकर प्रशांत नारायण | | | |
| ३८ | मुन्ना सिंग | | | |
| ३९ | ॲड. रवि व्यास | | | |
| ४० | दिप्ती शेखर भट | | | |
| ४१ | मयेकर सरस्वती रजनकांत | | | |

ठराव बहुमताने मंजुर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर :-

सभा संपली असे मी जाहिर करते.

(सभा संपण्याची वेळ दु. २.३० वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

